**Office of the Additional Principal Chief Conservator of Forests,**
**Mangrove Cell, Mumbai**
302, Wakefield House, 3rd Floor, Ballard Estate, Above Britannia & Co. Restaurant,
Fort, Mumbai-400 001.
**Ph: 022-2694984, 22694985, Email: ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com.**

Mangrove Cell / DCF / 389 /2023-24 Date: 23/02/2024

**To,**

**The Prothonotary and Senior Master**
**Hon'ble High Court, Mumbai.**

**Sub: - Compliance report by the Mangrove Monitoring Committee as per the Directions of Hon'ble Bombay High Court order dated 17th September, 2018 in PIL 87/2006.**

The Hon'ble Bombay High Court vide order dated 17th September, 2018 in PIL 87 of 2006 has directed the monitoring committee headed by the Divisional Commissioner as mentioned in Government Resolution dated 16th October, 2018 to submit compliance report after every three months. Accordingly, I am submitting the **17th Compliance report** of the said committee. The same may please be brought to the notice of the Hon'ble Bombay High Court.

o/c

**( Anitta Patil )**
**Member Secretary**
**State Mangrove Monitoring Committee**
**And**
**Deputy Conservator of Forest, Mangrove Cell.**

Copy to: Government Pleader (Original side), Bombay High Court.
Copy to: Chairman and Additional Chief Secretary (Revenue), Government of Maharashtra.
Copy to: Principal Secretary (Forest), Government of Maharashtra.
Copy to: Chairman and Divisional Commissioner, Konkan Division.

RECEIVED
Sr. No.
23 FEB 2024
ASSTT. SO.
Original Side Lodging Section

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 28 वी बैठक**
**दिनांक 30.01.2024 रोजीचे इतिवृत्त**
**मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.**

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग तसेच समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 28 वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीशः अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | श्री. महेंद्र कल्याणकर | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| 2. | श्री. एस. व्ही. रामाराव | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 3. | श्री. विवेक गायकवाड | उप आयुक्त (महसूल), कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 4. | श्री. अजितकुमार जैन | भारतीय प्रशासकिय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी | -- |
| 5. | श्रीमती अनिता पाटील | सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 6. | श्री. दिपक खाडे (व्ही.सी.द्वारे) | विभागीय वन अधिकारी, चिपळूण | विभागीय वन अधिकारी चिपळूण यांचे कार्यालय |
| 7. | श्री. रेवण लेंभे (व्ही.सी.द्वारे) | तहसिलदार (महसूल), ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| 8. | श्री. चंद्रकांत सूर्यवंशी (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय |
| 9. | श्री. मच्छिंद्र सुकटे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे कार्यालय |
| 10. | श्री. चंद्रसेन पवार (व्ही.सी.द्वारे) | तहसिलदार (महसूल), जिल्हा पालघर | जिल्हाधिकारी पालघर यांचे कार्यालय |
| 11. | श्री. सतीश बागल (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय |
| 12. | श्री. धनाजीराव धायगुडे | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 13. | डॉ. सुनिल जाधव | नायब तहसिलदार, पनवेल | उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय |
| 14. | डॉ. सागर घोलप | उपायुक्त, वसई विरार मनपा | वसई विरार महानगरपालिका |
| 15. | श्री. शेखर घाडगे | उपविभागीय अधिकारी, वसई | उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसई |
| 16. | श्री. जितेंद्र जगदाळे | सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर | ठाणे आयुक्तालय |
| 17. | श्री. संजय एस. केदारे | पोलीस निरीक्षक, पो. ठाणे | मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालय यांचे कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| 18. | श्री. नितिन भि. विजयकर | पोलीस निरीक्षक (सु.शा.) ठाणे ग्रामिण | मा.पो.अधिक्षक ठाणे ग्रामिण |
| 19. | श्री. मारुती बबन हिरवे | पोलीस उप निरीक्षक, चारकोप पोलीस स्टेशन | मुंबई आयुक्तालय, चारकोप पोलीस स्टेशन |
| 20. | श्री. शरद काशिनाथ वाघमारे | मुंबई आयुक्तालय, पोलीस उप निरीक्षक | बांगुरनगर पोलीस ठाणे |
| 21. | श्री. अभय धुरी | पोलीस उप-अधिक्षक, वाचक, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण | विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण यांचे कार्यालय |
| 22. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| 23. | श्री. संजय कुमार समोट | उपअधिक्षक | उपनमक आयुक्त कार्यालय, ट्रॉम्बे |
| 24. | श्री. अनिल द. क्षीरसागर | कार्यकारी अभियंता (पर्यावरण) | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 25. | श्री. योगेश गुणीजन | सहा. आयुक्त (पर्यावरण) | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| 26. | श्री. अजय वानखेडे | उप नियोजनकार (पर्यावरण), सिडको | सिडको कार्यालय (CIDCO) |
| 27. | श्री. सुर्यकांत कांबळे | पोलीस निरीक्षक, उरण पोलीस ठाणे, नवी मुंबई | नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, पोर्ट डिव्हीजन |
| 28. | श्री. अवधूत तावडे | उपायुक्त | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| 29. | श्री. संजय बी. चव्हाण | पोलीस निरीक्षक | नवी मुंबई पोलीस ठाणे |
| 30. | श्री. विशाल मदने (व्ही.सी.द्वारे) | अवर सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (कांदळवन प्रतिनिधी) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 31. | श्री. शिवाजी डी. फडतरे | पोलीस उप - अधिक्षक (SDPO. पेण) | पोलीस अधिक्षक रायगड |
| 32. | श्री. सुदेश अं. परब | सहायक आयुक्त, परिमंडळ 1, नवी मुंबई | नवी मुंबई महानगरपालिका |
| 33. | श्री. उमेश अ. पाटील | AE (SWM) T | सिडको पर्यावरण |
| 34. | श्री. जयंत ज. कांबळे | DE (NMMC) T | BMC T Ward |
| 35. | श्री. सुशिलकुमार अं. शिंदे | पोलीस निरीक्षक, नवघर पो.स्टे. | मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय |
| 36. | श्री. नितिन भि.विजयकर | पोलीस निरीक्षक | पोलीस अधिक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण |
| 37. | डॉ. श्रीराम एस. पवार | उपायुक्त,  नवी मुंबई महानगरपालिका, झोन - 2 | नवीमुंबई महानगरपालिका |
| 38. | श्री. आवेश मुकादम | प्रकल्प समन्वयक | Environmental Reasearch Foundation (ERAF) |
| 39. | डॉ. कृष्णा कला | संचालक | Environmental Reasearch Foundation (ERAF) |
| 40. | श्री. सचिन विजय चव्हाण | पोलीस उप निरीक्षक | विक्रोळी पोलीस ठाणे |
| 41. | श्री. सुशिल शामराव लोंढे | सहाय्यक पोलीस निरीक्षक | ट्रॉम्बे पोलीस स्टेशन |
| 42. | श्री. अमोल देवराम जगदाळे | पोलीस उप निरीक्षक | वडाळा पोलीस स्टेशन |
| 43. | श्रीमती. हेमा रमाणी | बी.ई.ए.जी. | बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप |
| 44. | उप विभागीय अधिकारी कणकवली | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |

| | | | |
|---|---|---|---|
| 45. | उप विभागीय अधिकारी कुडाळ | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| 46. | पोलीस अधिक्षक पालघर | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| 47. | पोलीस अधिक्षक रत्नागिरी | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| 48. | उप निबंधक अधिकारी (S.R.O) चिपळूण | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| 49. | श्रीमती रेशमा पिटाले | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| 50. | दापोली पोलीस स्टेशन | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| 51. | श्री. प्रशांत मर्दे (व्ही.सी.द्वारे) | सहायक पोलिस आयुक्त, मुंबई पोलिस | पोलीस उपायुक्त (अभियान), मुंबई |
| * | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे कार्यालय (MHADA) | अनुपस्थित | |
| * | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) | अनुपस्थित | |

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| 1 | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | • सदर विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका 87/2006 अन्वये पारित केलेल्या कांदळवन क्षेत्राच्या हस्तांतरणांच्या आदेशांबाबत समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच कांदळवन कक्ष, मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार जिल्हानिहाय / शासकीय विभागनिहाय (महसूल तसेच इतर विभाग) संबंधित विभागाच्या अधिपत्याखाली खाली नमुद केलेले कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्यासाठी प्रलंबित असल्याचे सांगितले. |

| अ.क्र. | जिल्हा | शासकीय विभाग | क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | सिंधुदूर्ग | महसूल | 58.10 | या संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एकूण 58.10 हेक्टर क्षेत्रापैकी मौजे म्हारतळे, ता.वेंगुर्ला येथील शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्राची एकूण 8.24 हेक्टर क्षेत्राची ड्रोनव्दारे मोजणीची कार्यवाही पूर्ण करुन सदरचे क्षेत्र वन विभाग, सावंतवाडी यांचे ताब्यात देण्यात आले असल्याचे सांगितले. तसेच, उर्वरित क्षेत्राची मोजणी करुन वन विभाग, सावंतवाडी यांचे ताब्यात देण्याबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांना सूचना देण्यात आले असल्याचे सांगितले आहे. |
| 2 | रत्नागिरी | महसूल | 579.01 | या संदर्भात मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरणबाबत त्वरीत बैठक घेण्याचे निर्देश दिले व त्याबाबतचा कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण अहवाल 15 दिवसात सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. |
| 3 | पालघर | वसई-विरार महानगरपालिका | 1277.58 | या संदर्भात उपविभागीय अधिकारी, वसई यांनी कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाबाबत वन विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, डेप्युटी SLR यांचा संघ (Team) कांदळवन क्षेत्र मोजणी करण्याकरिता करण्यात आलेला असून, मोजणीची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल 15 दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. |
| 4 | रायगड | JNPT | 70.33 | या संदर्भात मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी रायगड जिल्ह्यातील कांदळवन विभागास अवगत नसलेल्या कांदळवन क्षेत्राची तपासणी करुन सदर क्षेत्र हस्तांतरीत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांना निर्देश दिले. |
| 5 | ठाणे | महसूल | 2.69 | सदर क्षेत्रावर अतिक्रमण झाले असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी सांगितले. |
| 6 | मुंबई शहर | महसूल | 23.65 | या संदर्भात सदर क्षेत्र केंद्र शासनाच्या अंतर्गत सॉल्ट पॅन विभागाच्या ताब्यात असल्याचे मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी सांगितले. |
| 7 | मुंबई उपनगर | महसूल | 0 | |
| | | **एकूण** | 2011.36 | |

| | | |
|---|---|---|
| 2 | मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.17.09.2018 च्या आदेशातील परिच्छेद क्रमांक 73 नुसार कांदळवनाच्या Restoration बाबत सर्व यंत्रणांना माहिती देण्यासाठी कांदळवन विषयातील तज्ञांची कार्यशाळेबाबत चर्चा. | • मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.17.09.2018 च्या आदेशातील परिच्छेद क्रमांक 73 नुसार कांदळवनाच्या Restoration बाबत सर्व यंत्रणांना माहिती देण्यासाठी कांदळवन विषयातील तज्ञांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यासंदर्भात समितीच्या बैठकीत उपस्थित सर्व यंत्रणांना कांदळवन कक्ष, मुंबई कार्यालयाचे उपसंचालक (संशोधन) व कांदळवन अभ्यासक, तज्ञ यांनी कांदळवने व कांदळवन पुन:लागवड माहिती PPT व्दारे सादर केली. त्याबाबतची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. |
| 3 | भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी (IAS) श्री. अजितकुमार जैन, N वॉर्ड, मुंबई येथील कांदळवनांची वास्तविक परिस्थितीबाबत केलेल्या स्थळपाहणी संदर्भातील सादरीकरणाबाबत. | • यासंदर्भात Environmental Research Foundation (ERAF) संस्थेच्या संचालिका यांनी कांदळवन क्षेत्रातील डेब्रिज भराव हटविण्यासाठी वापरण्यात येणा-या प्रक्रियेबाबत समितीच्या बैठकीत उपस्थित सर्व यंत्रणांना PPT व्दारे सादरीकरण केले. त्याबाबतची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. |
| 4 | महाराष्ट्रातील सर्व सात (7) सागरी जिल्ह्यातील कांदळवना संदर्भातील प्राप्त तक्रारी कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी App ची निर्मिती करणेबाबत चर्चा. | • महाराष्ट्र राज्यात कांदळवन क्षेत्र असलेल्या मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सागर तटीय जिल्ह्यातील कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमण, कांदळवन तोड, अनधिकृत बांधकाम, कांदळवन क्षेत्रातील डेब्रिज भराव इत्यादी स्वरुपाच्या तक्रारी ईमेलद्वारे तसेच पोस्टाद्वारे तसेच इतर माध्यमांद्वारे कांदळवन कक्ष, मुंबई व या कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व प्रादेशिक कार्यालयात नागरिकांमार्फत प्राप्त होत असतात. त्यानुसार विविध कार्यालयात विविध माध्यमांद्वारे कांदळवनाशी संबंधित प्राप्त झालेल्या सर्व प्रकारच्या तक्रारी एकाच व्यासपीठावर आणणेकरीता Maha Mangrove Complaint App ची निर्मिती करण्याचे नियोजन समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी केले आहे. सदर App च्या रचनेचे संक्षिप्त सादरीकरण समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी सर्व सदस्यांसमोर सादर केले व त्याबाबत चर्चा करण्यात येऊन मा.अध्यक्ष यांनी सदर App बाबत समितीच्या सर्व सदस्यांकरीता विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत सूचना दिल्या. |
| 5 | कांदळवन क्षेत्र ताब्यात असलेल्या सर्व जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका यांनी अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रामध्ये तात्काळ सी.सी.टी.व्ही व बेरीकेडस बसवावे तसेच MRSAC, नागपूर यांचेकडून सेटेलाईट मॅपिंग करण्याच्या व त्यासाठी लागणारा खर्च हा नाविन्यपूर्ण उपक्रमातून करुन त्याबाबतचा | • यासंदर्भात मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी Maharashtra Remote Sensing Application Centre, (MRSAC) नागपूर यांच्यासमवेत Mapping of Mangroves using high resolution satellite data for Coastal Areas of Thane, Palghar, Raigad, Ratnagiri, Sindhudurg, Mumbai district and Mumbai Suburban Area, Maharashtra State" याबाबत दि. 29 जानेवारी, 2024 रोजी रु.4.36 कोटीचा सामंजस्य करार करण्यात आल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे, कांदळवन संधारण घटक, मुंबई कडील विविध वनक्षेत्रामधील तसेच, उरण व पनवेल वनक्षेत्रातील अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रातील एकूण 195 ठिकाणाबाबतचा रु. 124 कोटीचा प्रकल्प अहवाल |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल दोन आठवड्यात समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते याबाबतची चर्चा. | शासनास सादर करण्यात येणार असून सदर प्रकल्प अहवालास शासनाच्या मंजूरीनंतर निविदा काढण्यात येणार असल्याचे मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी सांगितले.<br>• तसेच, उपआयुक्त, वसई विरार, महानगरपालिका यांनी त्यांच्या क्षेत्रातील कांदळवनात सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले असल्याचे सांगितले. |
| 6 | कोकण विभागातील सात (7) सागती जिल्ह्यामधील कांदळवन तक्रारींबाबत दाखल झालेल्या गुन्ह्यांची तपासणी करणारे तपास अधिकारी (Investigation Officer) तसेच सदर जिल्ह्याचे पोलिस महानिरीक्षक (Inspector General of Police) यांची दि. 22.01.2024 रोजी बैठक आयोजित करुन सदर बैठकीमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांवर करण्यात आलेल्या पुढील कार्यवाहीबाबत आढावा घेण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते याबाबतची चर्चा | • यासंदर्भात पोलीस उप-अधीक्षक, **विभागीय पोलीस महानिरीक्षक, कोकण** यांनी सन 2005 ते सन 2023 या कालावधीत कोकण परिक्षेत्रातील पालघर जिल्ह्यात 8, रायगड जिल्ह्यात 35, रत्नागिरी जिल्ह्यात 5, सिंधुदूर्ग जिल्ह्यात 19 असे एकदंरीत 67 गुन्हे दाखल असून सदर 67 गुन्ह्यांमधील 34 गुन्ह्यांवर चार शिट फ़ाईल करण्यात आली आहे. 6 गुन्ह्यांमध्ये पोलीस तपास सुरु आहे व बाकी गुन्ह्यांचा निपटारा झाला असल्याचे सांगितले.<br>• तसेच, **पोलीस आयुक्तालय, ठाणे** यांच्या प्रतिनिधींनी सन 2015 ते सन 2023 या कालावधीत 62 गुन्हे दाखल असून त्यापैकी 49 गुन्हे न्यायप्रविष्ट आहे. 4 गुन्हे Disposed करण्यात आले आहे व 9 गुन्ह्यात आरोपी न मिळाल्याची समरी तयार करण्यात आली असल्याचे सांगितले.<br>• त्याचप्रमाणे **पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर** यांच्या प्रतिनिधींनी सन 2020 ते सन 2023 कालावधीत 11 गुन्हे दाखल असून त्यापैकी 7 गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. 2 गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न झाले आहे व उर्वरित गुन्ह्यांची समरी करण्यात आली असल्याचे सांगितले.<br>• तसेच, **पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई** यांच्या प्रतिनिधींनी सन 2005 ते सन 2023 या कालावधीत उरण 16, नाव्हाशेवा 3, कळंबोली 5, खारघर 1, कामोठे 1 असे एकदंरीत 25 गुन्हे दाखल असून सर्व 25 गुन्हे Dispoesd करण्यात आले असल्याचे सांगितले.<br>• सहायक पोलीस आयुक्त, **पोलीस आयुक्तालय, मुंबई** यांना गुन्ह्यांचा आढावाबाबत संबंधितांसमवेत त्वरीत बैठक घेऊन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. |
| 7 | मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना | • कोकण विभागाअंतर्गत सात (7) सागरी जिल्ह्यातील कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीकडे प्राप्त होणा-या तक्रारींच्या वाढते प्रमाणामुळे दरमहा बैठकीत सर्व तक्रारींवर चर्चा करणे शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेता पुढील बैठकीपासून प्रत्येक जिल्ह्यातील मर्यादित तक्रारी घेऊन त्यावर चर्चा करणे योग्य होईल असे मा.अध्यक्ष व मा.सह-अध्यक्ष यांनी निर्देश दिले. |

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व त्याबाबत केलेली कार्यवाही.**

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 1 | तक्रार क्र.12 श्री. लुक मेंन्डीस दि.30.11.2018<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • मा.अध्यक्ष यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना डेब्रिज काढण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सादर करावा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी आठ दिवसात आवश्यक कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करावा.<br>• यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा कार्यालयाचा दि.20.10.2023 रोजीच्या पत्रान्वये समितीस सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, तक्रारदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेले ठिकाण माहिम सायन धारावी लिंकरोड लगत रस्त्याच्या उत्तर दिशेला असून सदर क्षेत्र मुंबई उपनगर जिल्ह्यात येत नसून ते मुंबई शहर जिल्हा यांच्या कार्यक्षेत्रामध्ये येते आहे. सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील दि.10.10.2023 रोजीच्या अहवालामध्ये तक्रारीत नमूद जागा माहिम-सायन लिंक रोड एच/पूर्व विभागाच्या हद्दीत नसून, सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग म्हणजेच मुंबई शहर यांच्या हद्दीत येत असल्याने सदर तक्रार मुंबई शहर यांसकडे वर्ग करावी, असे नमूद आहे.<br>• याबाबत, मा.अध्यक्ष यांनी सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग यांना सदर तक्रारीबाबत केलेला कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | बृहन्मुंबई. महानगरपालिका |
| 2<br>3 | तक्रार क्र.21 श्री.बी.एन.कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.09.12.2018<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves.<br>तक्रार क्र.83 श्री.बी.एन.कुमार दि.01.08.2018<br>Mangrove killing along Sion-Panvel highway - Request for rapid action force. | • मा.अध्यक्ष यांनी तक्रार क्रमांक 21 बाबत सॉल्ट पॅन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास जमीन हस्तांतरण केल्याचे पत्र जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयास सादर करुन त्याची प्रत समितीस सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• या दोन्ही तक्रारींबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी तक्रारदार तसेच उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका आणि उप विभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांची संयुक्त स्थळपाहणी करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले होते.<br>• तथापि, उपायुक्त मिठागरे, मुंबई यांच्या दि.10.10.2023 रोजीच्या अहवालानुसार सायन-पनवेल महामार्गाच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्याने सार्वजनिक बांधकाम विभागासाठी विचाराधीन जमीन संपादित केली होती. जमिनीच्या तपशिलाची प्रत, विविध सार्वजनिक प्रयोजनांसाठी इतर विभागाकडे हस्तांतरित करणे, 31 जुलै 1986 रोजीच्या अधिसूचनेची प्रत आणि LAQ क्रमांक 361/2 मधील पुरस्काराची प्रत अहवालासोबत जोडली असून जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांस ईमेलद्वारे कळविल्याचे दिसून येत आहे.<br>• तक्रार क्र.21 सायन-पनवेल महामार्गावर योगायतन बंदर-रोड पोलीस चौकीजवळील जमिनीवरील कांदळवन नष्ट करण्याबाबत असून, प्राप्त माहितीनुसार, असे नमूद केले आहे की जमिनीचा एक छोटासा | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पट्टा (250 मीटर X 30 मीटर) भिंतीने वेढलेला आहे. उत्तरेकडील महामार्ग आणि दक्षिण बाजूला रेल्वेने सन 2001-2003 दरम्यान महामार्गाच्या बांधकामासाठी PWD द्वारे इतर जमिनीसह हा भूखंड संपादित केला होता आणि सदर भूखंड हनुमान सॉल्ट वर्क्स, ट्रॉम्बे सॉल्ट फॅक्टरीचा भाग होता. सध्याचा महामार्ग हा Two ways मार्ग असून 2001-2003, दरम्यान तो Four ways मध्ये बांधला गेला होता. महामार्गाच्या रुंदीकरणत सदर जमिनीचा वापर करण्यात आलेला नसल्याने सदर जमिन रिकामीच राहिली आहे. या जमिनीत उगवलेल्या कांदळवनाचे काही दृष्कृत्ये करणा-यांनी डेब्रिज टाकून नुकसान केले आहे.<br>• तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयाच्या दि.16.10.2023 रोजीच्या अहवालानूसार, उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगरे, मुंबई उपनगर जिल्हा यांचे दि.03.10.2023 रोजीच्या पत्रान्वये सदर ठिकाणी झालेले अतिक्रमण निष्कासित करणेसाठी दि.10.07.2023 व दि.12.09.2023 रोजीच्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी, (अति/निष्का), चेंबूर यांना कळविण्यात आले आहे. परंतु, उपजिल्हाधिकारी, (अति/निष्का), चेंबूर यांनी दि.20.09.2023 रोजीच्या पत्रान्वये सदर निष्कासनाबाबत कार्यवाही करीता अधिकारीता निश्चित करण्यात आलेली नाही असे नमूद केलेले आहे.<br>• तसेच तक्रारीत नमूद ठिकाणावरील अतिक्रमण निष्कासित न झाल्यास कांदळवनाचा ऱ्हास होण्याची शक्यता असल्याने दि.22.12.2021 रोजीच्या पत्रान्वये उप जिल्हाधिकारी, चेंबूर यांना निष्कासनाची कार्यवाही तात्काळ करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे स्तरावरुन आदेश देणेबाबत विनंती केली असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्यानुसार, मा. अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सदर तक्रारीतील नमूद स्थळावरील डेब्रिज काढणे व अतिक्रमण निष्कासित करणेबाबत केलेल्या कार्यवाहीचे छायाचित्रे व अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| | | • 2) तक्रार क्रमांक 21 संदर्भात सॉल्ट पॅन विभागाने नमूद केलेल्या **Transfer of Salt Pan Land which was notified under mangroves to Forest Departmennt** – याबाबत, मा. अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना याबाबत सद्यस्थितीबाबतचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| 4 | तक्रार क्र.118 श्री. हरीश पांडे दि.25.01.2020<br>Large scale CRZ 1 reclamation & mangroves Destruction in Ganpat Patil Nagar in Dahisar, Mumbai. | • बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक 16.10.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर बाबतीत तक्रारदार श्री. हरिष पांडे यांचे समवेत दि.31.08.2023 रोजी संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली. स्थळपाहणीकरीता मंडळ अधिकारी बोरीवली, वनपाल बोरीवली, वनरक्षक बोरीवली, नगर भूमापन अधिकारी बोरीवली, एम.एच.बी. पोलिस स्टेशन बृहन्मुंबई महानगरपालिका आर/उत्तर विभागातील अधिकारी उपस्थित होते. सदर स्थळपाहणी दरम्यान वनपाल, बोरीवली यांनी सदर जागेचे GPS reading घेऊन पंचनामा तयार केला आहे. त्याबाबतचा अहवाल वनपरिक्षेत्र अधिकारी, मुं.कां.सं.घ. पश्चिम मुंबई | बृहन्मुंबई, महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर योग्य ती उचित कार्यवाही महानगर पालिकेतर्फे करण्यात येईल असे नमूद केले आहे.<br>• याबाबत, मा.अध्यक्ष यांनी उप विभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर व उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आवश्यक कार्यवाही करुन केलेला कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.12.01.2024 रोजीच्या अहवालानूसार मौजे एक्सर, ता.बोरीवली येथील स.क्र.221, न.भू.क्र.532 पै या मिळकतीवर तक्रारीच्या अनुषंगाने नमुद जागेची दि.05.09.2023 रोजी तक्रारदार श्री. हरीष पांडे व संबंधित कार्यालय/विभाग यांचे समवेत स्थळपाहणी केली असता, कांदळवन कक्षाकडून एकुण 16 ठिकाणांचे जी.पी.एस रीडींग घेण्यात आले. जी.पी.एस क्र.8, 9,13,14,15 चे ठिकाण हे कांदळवन विभागाचे ताब्यात आहे. जी.पी.एस क्र.1,2,3,4,5,6,7,10,11,12,16 चे क्षेत्र हे खाजगी मालकीचे आहे. जी.पी.एस क्र.10, 11, 12, 16 हे क्षेत्र कांदळवनापासून 50 मी. च्या आत येत आहेत. तसेच 2005 साली सदर जागेवर कांदळवन होत असे अहवालात नमुद केले आहे. सदर तक्रारीत नमुद जागेबाबत अधिसुचित कांदळवन क्षेत्रावर असलेल्या अतिक्रमणावर कांदळवन विभागामार्फत बोरीवली रौ.गु.क्र. E/11/2029-20, दि.10.12.2019 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मा.सहा.वनसंरक्षक यांचेमार्फत गल्ली क्र.5 ते 14 मधील अधिसुचित कांदळवन क्षेत्रात येणाऱ्या अतिक्रमणधारकांची सुनावणी घेण्यात आली आहे असे कांदळवन कक्षाच्या अहवालात नमूद केले आहे.<br>• प्रकरणी मौजे-एक्सर, गणपत पाटील नगर मधील गल्ली क्र. 1 ते 4 च्या टोकाकडील कांदळवन क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतु गल्ली क्र. 5 ते 14 टोकाकडील बाजुचे कांदळवन क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्राचा भाग आहे. तक्रारदार यांनी दाखवल्याप्रमाणे जागेची पाहणी केली असता, गल्ली क्र. 10, 11, 12, 13 व 14 च्या टोकाकडील बाजूस कांदळवनालगत मोठया प्रमाणात भराव टाकून कच्ची घरे बांधलेली आहेत. तसेच कांदळवनालगत मोठया प्रमाणात भराव केला आहे व प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये रबिट भरुन रस्त्यावर ठेवलेले आहे. तसेच सदर ठिकाणी कांदळवनाची झाडे सुकलेली आहेत. गल्ली क्र. 5 च्या टोकाकडील बाजूस कांदळवनालगत मातीच्या सहायाने मत्स्य पालनाचे तलाव बनवलेले आहे. तसेच रबिट/भराव करुन रस्ता व कच्ची घरे बनवलेली आहे. गल्ली क्र. 6, 7, 8 च्या टोकाला बाजुस भराव तसेच कच्ची घरे, म्हशीचा तबेला बनवलेला आहे. गल्ली नं. 9, 10, 11, 12, 13 व 14 च्या टोकाकडील बाजूस कांदळवनालगत मोठया प्रमाणात भराव करुन कच्ची पक्की घरे बनवलेली आहेत. तसेच गल्ली क्र. 14 च्या टोकाकडील बाजूस भराव व प्लास्टिकचा कचरा कांदळवनालगत टाकलेला आहे.<br>• प्रकरणी मौजे एक्सर स.नं.221 ही मिळकत श्री ज्ञानेश कमलाकर सामंत यांचे नावे असल्याचे 7/12 सदरी दिसून येते. तसेच 7/12 सदरी इतर हक्कात मा.आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचेकडील तसेच मा.जिल्हाधिकारी साहेब, मु.उ.नि.यांचेकडील हु.नं. सी/कार्या-2/क.क/दि. 10/01/2003 प्रमाणे तिवरांच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झाडांची नोंद केली आहे. सबब, प्रकरणी तक्रारदार यांनी तक्रारीत नमूद केलेले ठिकाण हे खाजगी जागा असल्याने CRZ-1 बाबत सहा.आयुक्त, आर/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कार्यवाही करणे अभिप्रेत राहील, असे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 5 | श्रीम.आदिती प्रधान.<br>तक्रार क्र. 69<br>Debris dumping in Lokhandwala Mangrove in Andheri West.<br>दि.20.04.2019 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.12.02.2020 रोजीच्या अहवालानुसार तक्रारीत नमूद ठिकाण हे मौजे वर्सोवा, ता.अंधेरी स.क्र.120 अ, येथील मिळकत "महाराष्ट्र हौसिंग बोर्ड" यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रिस हे कांदळवन क्षेत्र व त्यापासून ५० मीटरच्या आत आहे.<br>• तद्नूसार मा.मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे.<br>• तद्नूसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा यांच्या दि.08.06.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे – वर्सोवा, ता. अंधेरी येथील स.न.120, न.भू.क्र.1374 अ या ठिकाणी स्थळपाहणी करण्यात आली असून दि.16.03.2023 रोजीचा पंचनामा, संबंधित जागेचे छायाचित्रे समितीस पाठविण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रिज हे कांदळवन क्षेत्रात टाकण्यात आलेले असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी तात्काळ एफ.आय.आर दाखल करावा आणि सदर प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे कार्यालयाचा दि.25.10.2023 रोजीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, मौजे वर्सोवा, ता.अंधेरी येथील स.न.120, न.भू.क्र.1374 अ या ठिकाणी दि.16.03.2023 रोजी स्थळ पाहणी करण्यात आली असून सदर मिळकत मुंबई मंडळाच्या एस.व्ही.पी.नगर अभिन्यासाच्या हद्दी बाहेर आहे. यामुळे म्हाडातर्फे सदर प्रकरणी FIR दाखल करणे नियमानुसार शक्य होणार नाही. त्यामुळे सदर कार्यवाही मुंबई, महानगरपालिके मार्फत करणे उचित होईल असे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रार प्रकरणी बृहन्मुंबई, महानगरपालिका यांनी आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.21.12.2023 रोजीच्या अहवालानुसार स्थळ पाहणी दरम्यान असे निदर्शनास आले की, मौजे – वर्सोवा ता.अंधेरी येथील स.न. 120, न.भू.क्र. 1374 अ जागा महानगरपालिकेच्या हद्दी बाहेर आहे. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.जमीन-07/2013/प्र.क्र.374/ज-1 दिनांक 10.10.2013 च्या सुचना क्रमांक 03 नूसार शासकीय जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या | बृहन्मुंबई, महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभागाच्या / संस्थेच्या स्थानिक अधिकारी यांनी तात्काळ पोलीसात फिर्याद देण्यात दक्षता घ्यावी. सदर परिपत्रकामध्ये जबाबदारी स्पष्ट केली आहे त्याचे अवलोकन करावे.<br>• सबब, विषयांकित बाबतीत जिल्हा कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती यांजकडून पोलीसात फिर्याद दाखल करण्यात यावी असे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रारीबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाचे दि. 29.12.2023 रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करुन कार्यवाहीबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर व सहा आयुक्त, के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| | | • 2) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे कार्यालयाचा दि.03.11.2023 रोजीच्या पत्रानूसार म्हाडा मंडळाच्या अखत्यारीतील जे अभिन्यास आहेत किंवा इतर जमिनी आहेत, अशा जमिनीपैकी कोकण मंडळाच्या ताब्यातील कोलशेत येथील सर्व्हे क्र. 20/5 पै, 7 पै, 8,9,10, स.नं.21/1 पै, 57 पै, 8 पै, स.न.31/1 पै, 4 पै, 5, 6 पै, स.न.32/3, 4 व 5, स.नं.22/3 पै, 7 पै, 8 पै या क्षेत्रापैकी काही कांदळवन क्षेत्र येत असल्यामुळे या कार्यालयामार्फत कोलशेत जमिनीची मोजणी करण्याकरिता नगर भुमापन अधिकारी ठाणे व वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे कांदळवन यांना पत्रव्यवहार करण्यात आला होता.<br>• त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे यांनी म्हाडा मिळकतीतील सर्व्हे क्रमांकापैकी स.न.22/3ब, 22/7 ब, 22/8 ब, 31/1 अ, 31/1 ब, 31/1 क, 31/4 अ, 31/4 ब, 31/5, 31/6 अ, 31/6 ब, 32/5, 32/3 ब हे अधिसूचना क्र. एफएलडी-12/2020 प्र.क.286/फ-3 दि.22.01.2021 अधिसूचित झाली असून सदर अधिसुचित सर्व्हे क्रमांकाचा ताबा मंडळ अधिकारी, बाळकुम ता.जि.ठाणे यांनी वनपाल, ठाणे कांदळवन या कार्यालयाला दि.11.06.2021 रोजी दिला असल्याचे संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार म्हाडाच्या कोकण मंडळातील कोलशेत येथील कोणतेही क्षेत्र कांदळवन बाधीत होत नसल्याचे कळविले आहे. | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियो./प्रा., महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण |
| 6 | श्री. स्टॅलिन डी. तक्रार क्र. 160<br>Request to respect Municipal Commissioner Carter Road at Bandra Mangrove pollution.<br>दि.18.10.2021 | • मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर क्षेत्रात झालेली भरणी काढून टाकण्यासाठी ठोस नियोजन पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले होते. यासंबंधी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या होत्या. तसेच सर्व महानगरपालिका यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कांदळवन क्षेत्रात टाकलेला भराव काढण्यासाठी ठोस नियोजन पुढील बैठकीपूर्वी सादर करावे यासाठी सदस्य सचिव यांनी पत्र सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• याबाबत, विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. कुर्ला यांनी आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या. | 1. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला<br><br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.12.01.2024 रोजीच्या अहवालानुसार तक्रारीतील नमूद ठिकाणची दि.21.12.2023 रोजी सदर मिळकतीची संयुक्त स्थळपाहणी केली असता, सदर जागेवर खूप वर्षापासून जुना भराव जमा झालेला दिसून आला. तसेच काही भराव/रेती भरती-ओहोटी वेळी जमा झालेली दिसून आली. सदर भरावामुळे समुद्राचे पाणी कडेपर्यंत येत नसल्याचे दिसून आले, तसेच नाल्याचे पाणी समुद्रात जात नसल्याचे दिसून आले. सदर ठिकाणाच्या रेल्वे कॉलनी मधून नाल्याचे पाणी येत असल्याने ते भरावामुळे तिथेच थांबले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कांदळवनाची झाडे सुकलेली दिसून आली असल्याचे नमूद केले आहे.<br>• तरी सदर जागेवरील भराव काढून टाकण्याबाबत सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानरगपालिका यांना या कार्यालयाकडील दि.05/01/2022, दि.06/07/2022 व दि.03/10/2023 रोजीच्या पत्राने नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करणेकामी कळविणेत आलेले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 7 | तक्रार क्र. 196 श्रीमती श्वेता वाघ – दि. 22.09.2022 Dumping of debris, and destruction of mangrove habitat in versova near KPS memorial school. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.31.03.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद ठिकाण राखीव वन म्हणून अधिसूचित झालेली असून सदर मिळकतीचा ताबा दि.09.04.2021 रोजी वनविभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी वनविभागामार्फत गु.क्र.E/34/2021-22, दि.23.10.2021 अन्वये वनगुन्हा नोंदवण्यात आला आहे. जागेवर रस्त्याचे काम चालू असताना 1 डंपर व 2 जे.सी.बी. ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. प्रकरणी वनविभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु असल्याबाबत नमूद केले आहे.<br>• सदर तक्रार प्रकरणी विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांनी आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला यांच्या दि.18.12.2023 रोजीच्या अहवालानूसार सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन नाही. तक्रारी अर्जातील क्षेत्र हे नगर भूमापन अधिकारी अंधेरी यांचेकडून प्राप्त नकाशानुसार अधिसुचित कांदळवन क्षेत्रापैकी असल्याने सदर क्षेत्रावर रौ.गु.क्र. E-34/2021-22, दि.23.10.2021 अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला असून सदर जागेवर रस्त्याचे काम चालु असताना 1 डंपर व 2 जे.सी.बी. ही वाहने जप्त करण्यात आली आहे.<br>• वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.1146, दि.16.11.2022 अन्वये अध्यक्ष, तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती तथा उपविभागीय अधिकारी, पश्चिम मुंबई उपनगर व क्र.1270 दि.09.12.2022 अन्वये तहसीलदार अंधेरी यांना त्याबाबत कळविण्यात आलेले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला |
| 8 | तक्रार क्र. 202 श्री.रेजी अब्राहम, मुंबई Destruction of Mangroves on 40 plus acres of govt land at prime | • सदर प्रकरणी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ अतिक्रमण आणि बांधकाम काढून पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते. | 1. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | location in borivali dahisar belt off Link Road. Date:29.11.2022 | • याअनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.16.10.2023 रोजीच्या अहवालानूसार मौजे एक्सर, ता. बोरीवली येथील स.क्र.221 पै, न.भू.क्र. 532 पै येथील दहिसर बेल्ट येथील ई-स्काय क्लब याठिकाणी भरणी करून कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील कलम 15(1) (2) अन्वये मंडळ अधिकारी बोरीवली यांनी एम.एच.बी. कॉलनी पोलिस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0292/2023 दि. 01.07.2023 अन्वये ज्ञानेश कमलाकर सामंत यांचेवर गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. तसेच, सर्वे क्र.221 पै, न.भू.क्र. 532 पै एस.के. रिसॉर्टच्यामागे, खुटारपाडा, बोरीवली (पश्चिम), येथील अनधिकृत बांधकामाबाबत दिनांक 10.04.2023 रोजी या कार्यालयामार्फत एकूण 5 गोडाऊनचे अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिका अधिनियमानुसार नोटीस बजावून निष्कासित करण्यात आले आहे. तसेच सदर ठिकाणी इतर एकूण 08 अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिका अधिनियमानुसार नोटीसां बजावण्यात आल्या आहेत व सदर नोटीसीविरोधात पक्षकाराने मा. न्यायालयात दावा दाखल केला आहे. तसेच, सद्यस्थितीत मा. न्यायालयाने सदर प्रकरणी स्थगिती आदेश दिले असून मा. न्यायालयाच्या अंतिम आदेशानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सदर बाबतीत अनधिकृतपणे होत असलेल्या भरणीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांतर्गत पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरिता संबंधित पोलीस ठाणेस संबंधितांवर गुन्हा नोंदविण्याबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• याबाबत, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना मा.न्यायालयाच्या अंतिम आदेशाची सद्यस्थिती जाणून घेऊन त्याबाबतचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्यानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाचा दि. 19 डिसेंबर, 2023 रोजीच्या अहवालात मौजे एक्सर, ता. बोरीवली येथील स.क्र.221 पै, न.भू.क्र. 532 पै येथील दहिसर बेल्ट येथील ई-स्काय क्लब याठिकाणी भरणी करून कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील कलम 15(1) (2) अन्वये मंडळ अधिकारी बोरीवली यांनी एम.एच.बी. कॉलनी पोलिस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0292/2023 दि. 01.07.2023 अन्वये ज्ञानेश कमलाकर सामंत यांचेवर गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. प्रकरणी मौजे एक्सर, ता.बोरीवली येथील स.न.221 पै न.भू.क्र.532 पै ही मिळकत खाजगी मालकीची असून त्यावर कच्चे ताडपत्रीचे व बांबुचे अंदाजे 10 ते 12 गोडावून दिसून आले, असे नमूद आहे.<br>• त्याबाबत, सहायक आयुक्त, आर/उत्तर दहिसर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सद्यस्थितीची चौकशी करुन केलेल्या कार्यवाहिबाबतचा परिपूर्ण अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाने दि. 19 डिसेंबर, 2023 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.<br>**• सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 9 | तक्रार क्र. 204 श्री.अली असगर मोहमद तहसिलदार, मालाड | • पोलीस उप आयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त यांचे कार्यालय यांचे दि.05.08.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीबाबत मालवणी पोलीस ठाणेस गुन्हे नोंद करण्यात आले असून सदर गुन्हयांचा | 1. पोलीस आयुक्त, मुंबई शहर |

| | | | |
|---|---|---|---|
| | मालवणी परिसरातील कांदळवन नष्ट करणारे भुमाफिया व महानगरपालिकेचे खाजगी ठेकेदार यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत. दि : 07.11.2022 | तपास करण्यात येत आहे. तसेच अर्जदार श्री.अली असगर मोहम्मद तहसिलदार यांना नमूद केलेल्या गुन्हयांबाबत माहिती दिली असता, त्यांनी समाधान व्यक्त करुन तक्रारीबाबत त्यांची सध्या कोणतीही तक्रार नसून त्यांनी केलेला तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले आहे. परिमंडळ 11 मधील समुद्र किनाऱ्या व खाडी लगत असलेल्या पोलीस ठाणेस, कांदळवन संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत गुन्हे दाखल करुन तपास करण्यात येत आहे.<br>• याप्रकरणी मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• याबाबत, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.12.01.2024 रोजीच्या अहवालानुसार प्रकरणी तक्रारीत नमुद ठिकाणी कांदहवन नाही. परंतु नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरचे आत येत आहे. सन 2005 साली कांदळवन सदर ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. सदरचे क्षेत्र म्हाडा विभागाच्या ताब्यातील आहे. याबाबत तहसीलदार बोरीवली यांनी दि.25.07.2023 रोजीच्या पत्राने म्हाडा विभागास कळविले आहे. तक्रार अर्जातील नमुद 6 ठिकाणी स्थळपाहणी करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.<br>• प्रकरणी तक्रारीत नमुद जागेवरील कांदळवनाच्या -हासाबाबत श्री. संजय दवे, समर्थ फाऊंडेशन यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मौजे मालवणी स.नं. 263 न.भू.क्र. 2 या शासकीय मिळकतीबाबत कांदळवन कक्षाच्या 24/04/2023 रोजीच्या अहवालानुसार सदरचे क्षेत्र कांदळवनापासून 50 मी.च्या आत येत असल्याने पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 च्या कलम 15 अन्वये मंडळ अधिकारी मालवणी यांनी मालवणी पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. 0890/2023 दि.14/07/2023 रोजी अनोळखी इसमावर गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर शासकीय मिळकतीवर अनधिकृत अतिक्रमण होत असल्याने अतिक्रमण निष्कासन करणेबाबत तहसीलदार बोरीवली यांनी उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/ निष्कासन), मालाड यांना दि.19/07/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• तसेच, सदर तक्रारींच्या अनुषंगाने वरील प्रमाणे तक्रारदार श्री. अली असगर मोहमद तहसीलदार यांनी दि.19/10/2022 रोजी केलेल्या अर्जातील नमुद 6 ठिकाणी स्थळपाहणी करून कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| 10 | तक्रार क्र. 206 श्रीमती. श्वेता भट Destruction of Mangroves by way of construction of walls at creeks along the Malad Marve road area, Malad West. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना भिंत तोडून पाण्याचा प्रवाह पुर्ववत करण्याचे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.16.10.2023 रोजीच्या अहवालानुसार विषयांकित प्रकरणी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण | 1. बृहन्मुंबई, महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि : 21.12.2022 | समिती यांनी उपायुक्त (विशेष), बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर भिंत तोडून पाण्याचा प्रवाह पूर्ववत करण्याचे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देशित केले. त्याअनुषंगाने या कार्यालयामार्फत सदर भिंतीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता नेमकी कोणती भिंत निष्कासित करायची आहे याबाबत कोणतीही माहिती मिळत नव्हती. यास्तव श्रीम. सविता पाडवे, मंडळ अधिकारी, मालवणी यांना संयुक्त स्थळ पाहणी करण्याकरिता विनंती केली असता तलाठी साझा, मालवणी यांसकडून मिळालेल्या माहितीनुसार तक्रार केलेल्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या नाल्याच्या रूंदीकरणाचे काम झाले असल्याचे समजते. सदर काम हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख अभियंता (प.ज.वा.) या विभागामार्फत करण्यात आल्याचे समजते. यास्तव या कार्यालयामार्फत प्रमुख अभियंता (प.ज.वा.) विभागाकडे पत्र क्र.एसीपीएन/1185/एसआर/एईबीएफ दि. 09.10.2023 अन्वये संबंधित तक्रारीबाबत उचित कार्यवाही करून कार्यपूर्ती अहवाल उपायुक्त विशेष आणि कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांस सादर करण्याकरिता कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• याबाबत, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्यानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाच्या दि. 05 जानेवारी, 2024 रोजीच्या अहवालात, सदर प्रकरणी तक्रारीत नमूद केलेल्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या नाल्याच्या रुंदीकरणाचे काम झाले असून सदरचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकाच्या प्रमुख अभियंता (प.ज.वा.) या विभागामार्फ़त करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर तक्रारीबाबत प्रमुख अभियंता (प.ज.वा.) पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करणेबाबत नमूद करण्यात आले आहे. | |
| 11 | तक्रार क्र.207 श्री. झोरु भातेना, मुंबई दि. 06.01.2022<br>जुहू कोळीवाडा बीच या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास व अतिक्रमण झाले असल्याबाबत. | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.04.07.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमूद क्षेत्रातील अतिक्रमणाबाबत महसूल विभागाकडून दि.01.04.2022 रोजी FIR 0251 अन्वये सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे या विभागाकडील सदर तक्रार निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.<br>• या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.16.10.2023 रोजीच्या अहवालानूसार उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) वांद्रे यांचेकडून क्र. उपजि/अति/निष्का/वांद्रे-1/टे.नं.-4/जुहू कोळीवाडा निष्कासन/2023/जा.क्र. दि.06.04.2023 रोजीच्या पत्राद्वारे मौजे जुहू ता.अंधेरी येथील जुहू कोळीवाडा, हिराबुआ गावडे मार्ग, सांताक्रुझ (पश्चिम) या सरकारी जागेवरील अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनासाठी मजूर मशिन पुरविणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयाद्वारे सदर (logistic Support) पुरविण्यात आले होते. तथापि पोलीस बंदोबस्त न मिळाल्यामुळे सदरची कारवाई पुनश्च दि. 16.05.2023 व 17.05.2023 ला आयोजित केल्याबद्दल उपजिल्हाधिकारी | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>3. MCZMA |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (अति/निष्कासन) वांद्रे यांचे क्र. टे-4/ जुहू कोळीवाडा/निष्कासन/2023/जा.क्र.321 दि. 03.05.2023 अन्वये कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने पुन:श्च मुकादम, मजूर व जेसीबी पुरविण्यात आले होते.<br>• याबाबत, पोलिस बंदोबस्ताकरीता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी पोलिस आयुक्त यांना त्यांच्या स्तरावर पत्र देणेबाबत सूचना दिलेल्या असून केलेला कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्यानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाचे दि. 27 डिसेंबर, 2023 रोजीच्या अहवालात, सदर तक्रारीतील नमूद क्षेत्रात होत असलेली भरणी काढून टाकणेबाबत / अतिक्रमाणापासून संरक्षण देणेकामी (गस्त) त्वरीत कार्यवाही करुन परिपूर्ण अहवाल देणेबाबत पोलीस उपायुक्त, परि-9, वांद्र, मुंबई व सहा. आयुक्त, के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प), मुंबई यांना दि. 27 डिसेंबर, 2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 12 | तक्रार क्र.216 श्री.सुमित अशोक धुरी. Merciless killing of Mangroves, illegal reclamation & encroachment of Forest land and constructions.<br>दि. 26.02.2023 | • सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागा वन विभागास हस्तांतरित केल्याचे सांगितले.<br>• या अनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• सदर तक्रार प्रकरणी विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांनी आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 8 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 13 | तक्रार क्र.217 श्रीमती गुंजन गुप्ता. Burning of Mangroves in Malad West (Near Mindspace/Evershine Nagar)<br>दि. 27.02.2023 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.24.07.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र दि.24.04.2023 अन्वये तक्रारीतील नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. सदरचे क्षेत्र हे खाजगी कांदळवन क्षेत्र असून MRSAC नकाशानूसार सदर जागेवर सन 2005 साली कांदळवन दिसून येते. परंतु सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. सदर क्षेत्राची पाहणी केली असता, सदर ठिकाणी इंजायली झाडे झुडपे दिसून येत आहेत व सदर ठिकाणी आग लागण्याच्या छोटया-छोटया खुणा दिसून आल्या. तसेच सदर ठिकाणी कोठेही कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नसल्याचे तहसीलदार बोरीवली यांचे अहवालानूसार नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• तथापि या प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना पुरवणी अहवाल 15 दिवसात सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुन:श्च सूचना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दि.05.01.2024 रोजीच्या अहवालात, प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र दि.24.04.2023 अन्वये तक्रारीतील नमूद | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. सदरचे क्षेत्र हे खाजगी कांदळवन क्षेत्र असून MRSAC नकाशानूसार सदर जागेवर सन 2005 साली कांदळवन दिसून येते. परंतु सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. सदर क्षेत्राची पाहणी केली असता, सदर ठिकाणी इंजायली झाडे झुडपे दिसून येत आहेत व सदर ठिकाणी आग लागण्याच्या छोटया-छोटया खुणा दिसून आल्या. तसेच सदर ठिकाणी कोठेही कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही.<br>• तदनंतर, विभागीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीकडील दि. 30.11.2023 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त दि. 18 डिसेंबर,2023 चे अवलोकन केले असता, सदर प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा पुरवणी अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना सादर करणेबाबत नमूद करण्यात आले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 14 | तक्रार क्र.227 Switsy Henriques, Borivali<br>Gorai Police station fails to accept FIR against mangroves being cut. दि. 13.04.2023 | • या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• याबाबत, दि. 06 डिसेंबर, 2023 रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी बैठक घेऊन सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांचे दि.18.12.2023 रोजीच्या अहवालानूसार जी.पी.एस.क्र.1 चे क्षेत्र हे खाजण क्षेत्रालगत असल्याचे दिसून येत आहे. व MRSAC नकाशानुसार जी.पी.एस. क्र.1 च्या ठिकाणी कांदळवन दिसून येत नाही. परंतु सद्यस्थितीत जी.पी.एस.क्र.1 च्या ठिकाणी मेस्वाक प्रजातीची झाडे असल्याचे दिसून येत आहे. तसेच जी.पी.एस.क्र. 2 च्या ठिकाणी मढ प्लॉट असल्याचे दिसून येत आहे. व त्या ठिकाणी कचरा, तसेच डेब्रिज टाकल्याचे दिसून आले.<br>• सदरचे क्षेत्र या विभागाच्या ताब्यात नाही व 50 मी बफर झोन क्षेत्रात कार्यवाही करण्याचे अधिकार महसूल विभागाकडे आहेत. वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांनी त्यांचे कार्यालयाकडील दि.18.04.2023 रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार बोरीवली व सहा. आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका, पी/उत्तर विभाग यांना पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986 अंतर्गत पुढील कारवाई करणेकरीता कळविण्यात आलेले आहे. तसेच तक्रारदार यांना त्याबाबत कळविलेले असल्याचे नमूद केले आहे. तसेच या कार्यालयाकडील दि.18.12.2023 रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986 अंतर्गत पुढील कारवाई करणेकरीता कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुंबई |
| 15 | तक्रार क्र.228 श्रीमती भाविता दुंगार दि. 11.04.2023<br>व श्री.अभिषेक कदम<br>दि. 06.04.2023 | • या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दयावेत. तसेच, झालेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते. | 1. सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.), पी/उत्तर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | Encrochment in CRZ and Forest areas near Marve Road. | • त्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.03.10.2023 च्या अहवालानुसार मौजे मालवणी, ता. बोरीवली स.क्र. 28/1 व 215, 28/3, 29/2 येथील मरीना एन्क्लेव येथील नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतु, जी.पी.एस.क्र.2,3, व 2 चे क्षेत्र खाजण क्षेत्रापासून 50 मी. च्या आत येत आहे. MR-SAC नकाशानूसार सन 2005 साली सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्यस्थितीत सदर ठिकाणी कांदळवन नाही. सदर क्षेत्रात अंदाजे 10 ते 12 गुंठे क्षेत्रात मुरूम, दगडाचा भराव टाकलेला दिसून आला. एक पक्की शेड, तीन ते चार कच्च्या स्वरूपाच्या झोपडया लगतच्या अंदाजे 15 x 15 मीटर मोजमापाची कच्ची शेड बांधली आहे. प्रकरणी तक्रारीत नमूद सदरचे क्षेत्र हे राखीव कांदळवनापासून 50 मीटरच्या आत येत असल्याने पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 (1)(2) अन्वये मंडळ अधिकारी, मालवणी यांनी मालवणी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र.0962, दि.29.07.2023 अन्वये अज्ञात इसमा विरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे.<br>• तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.30.10.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद केलेले स्थळ हे आर/दक्षिण विभागात येत असून सदर ठिकाणी झालेली अनधिकृत बांधकामे महाराष्ट्र शासनाच्या जागेवर असून सदर ठिकाणी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी बोरीवली -1 यांच्या कार्यालयामार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. सबब तक्रारीत नमूद ठिकाणी योग्यती कार्यवाही करण्याकरीता उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी बोरीवली -1 यांस दि.23.10.2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>• या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | बृहन्मुंबई महानगरपालिका<br><br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| 16 | तक्रार क्र.236 श्री. संजय सिंघ गणपत पाटील नगर, CTS No. 532, सर्व्हे नं. 221, एक्सार विलेज, न्यू लिंक रोड, दहिसर पश्चिम येथील तक्रारीबाबत. दि.23.03.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.16.10.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर बाबतीत श्री. संजय सिंघ यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी बोरीवली, वनपाल बोरीवली यांच्या समवेत दि.26.06.2023 रोजी संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली होती. तद्नंतर या विभागास दि.01.08.2023 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, बोरीवली पश्चिम, मुंबई यांचेकडील अहवालामध्ये अनधिकृत बांधकामाचे क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत असून सदरचे क्षेत्र हे सरकारी क्षेत्र आहे असे नमूद करण्यात आले आहे. तसेच सदर ठिकाणी पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 अन्वये प्राधिकृत अधिकारी (महसूल) यांनी कार्यवाही करणे अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.<br>• तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा कार्यालयाचा दि.20.10.2023 रोजीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, तक्रारीत नमूद क्षेत्र हे अधिसूचीत कांदळवनाचा भाग आहे. सदर ठिकाणी असलेल्या अतिक्रमणावर कांदळवन कक्षाचे बोरीवली रौंड गुन्हा नं. E/11/2019-20, दि. 20.12.2019 अन्वये गुन्हा | 1. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोंद करण्यात आलेला आहे. तसेच सदर गुन्हयाबाबत मा.दिंडोशी सत्र न्यायालयात केस चालू आहे. या प्रकरणी प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांचे मार्फत अतिक्रमणांना नोटीस देण्यात आली असून निष्कासनाची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे कांदळवन कक्षाच्या अहवालात नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन एकत्रित अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 17 | तक्रार क्र. 251 (अ)<br>**श्री. स्टॅलिन डी.**<br>Illegal Occupation of Chheda Nagar Reserved Forest in chembur, Mumbai.<br>दि.30.09.2023 | • या प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांनी आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• तथापि, या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.<br>• या प्रकरणी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाच्या दि.18.12.2023 रोजीच्या पत्रानूसार अध्यक्ष, तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर व सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा सहा. वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना सदर तक्रारीतील मुद्यांच्या अनुषंगाने सदर ठिकाणाची संयुक्त स्थळपाहणी करुन कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 18 | तक्रार क्र.255<br>श्री. सुमित अशोक धुरी<br>Complaint regarding shameless and merciless killing of Mangroves, illegal reclamation & encroachment of Forest land and construction of concrete wall and piling activities near stellar school at MHADA, Four Bungalows, Andheri - W, Mumbai दि.18.07.2023. | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा कार्यालयाचा दि.20.10.2023 रोजीच्या पत्रान्वये समितीस सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, मौजे वर्सोवा येथील न.भू.क्र. 1374/अ ची मिळकतपत्रिका पाहता मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.07.07.2008 रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचना क्र.म.शा/का-2/वने/सीआर/2211/डी, दि.05.07.2008 प्रमाणे मा.अ.भू.अ./मुंबई उ.न.जिल्हा यांचेकडील पत्र क्र.न.भू.सं.2/कांदळवन/2008, दि.30.07.2008 अन्वये न.भू.क्र.1374/अ पैकी 298770.00 चौ.मी.कांदळवन क्षेत्रास संरक्षीत वने म्हणून नोंद दाखल केली व या कार्यालयाकडील आदेश क्रमांक कार्या-2 आय/टे-8/कावि.का.क्षेत्र हस्तांतर/2020, दि. 06.10.2020 व दि. 07.12.2020 जा.क्र. 7927 आणि महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार क्र. 199 अ.क्र. 117(2) दि.17.10.2018, अ दि.08.03.2019 व अ दि. 20.03.2019, तसेच दि.09.04.2021 रोजीची ताबापावती अन्वये न.भू.वर्सोवा ता.अंधेरी येथील न.भू.क्र.1374/अ पैकी क्षेत्र 228970.00 चौ.मी. कांदळवन क्षेत्र अधिसुचित झालेने धारक सदरी महाराष्ट्र शासन "संरक्षित वने" (कांदळवन) अशी नोंद दाखल केली आहे. | विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • कांदळवन कक्षामार्फत वनरक्षक, गोराई यांनी सदर जागेचे GPS Reading घेतले असून वनरक्षक, गोराई यांनी सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फ़त अधिसुचित कांदळवन क्षेत्रात ओम सिध्दी कन्ट्रक्शन प्रा.लि. कंपनी यांचेकडून कुंपणभिंत बांधणेकामी पायलिंगद्वारे माती परिक्षणाचे काम चालू असताना सदरचे काम तात्काळ थांबवून उपरोक्त कंपनीवर क्र.E/18/2023-24, दि.24.07.2023 रोजी गुन्हा नोंद केलेला आहे. त्याबाबतची पुढील चौकशी सुरु असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांच्या दि.11.10.2023 रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांनी नोंदविण्यात आलेल्या गुन्हाचा सद्यस्थिती अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांचे दि.18.12.2023 रोजीच्या अहवालानूसार सदरचे क्षेत्र अधिसुचित कांदळवनाचा भाग आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली जी.पी.एस.क्र.2 च्या ठिकाणी कांदळवन आहे. कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.4 अंधेरी यांचे मार्फत अधिसूचित कांदळवन क्षेत्रात 3 ठिकाणी माती परिक्षण (बोअरहोल) करण्यात आले आहे. वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांनी बोरीवली रौंड गुन्हा क्र. E/18/2023 दि.24.07.2023 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिसूचित कांदळवन क्षेत्रातील साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्याबाबत पुढील तपास चालू असून तक्रारदार श्री. सुमित धुरी यांना अहवालाबाबतची वस्तुस्थिती दि.16.10.2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 19 | तक्रार क्र.259 श्री.धिरज परब मुंबईच्या गोराई येथील एस्सेल वर्ल्ड/ पॅन इंडिया या व्यावसायिक कंपनीने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी कटकारस्थान करुन कित्येक एकर जागेतील कांदळवन नष्ट करुन पर्यावरणाची हानी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करणे, केलेला भराव, बांध व बांधकामे काढून टाकून त्याचा खर्च तसेच पर्यावरणाची हानी केल्याची नुकसान भरपाई वसूल करणे तसेच पुन्हा खाडीच्या प्रवाहाचे नैसर्गिक मार्ग खुले करुन कांदळवन लागवड करणेबाबत. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 09.08.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला होता. तथापि, अहवाल अप्राप्त आहे.<br>• याबाबत, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना आवश्यक कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाच्या दि. 24 जानेवारी, 2024 रोजीच्या अहवालात, प्रस्तुत प्रकरणी पॅन इंडिया पर्यटन प्रा.लि. यांनी घेतलेल्या परवानग्या, मा.मुख्य वन संरक्षक (मंत्रालय) यांचेकडील दि. 17 एप्रिल, 2023 चे पत्र सीआरझेड अधिसूचना 18 जानेवारी, 2019 नुसार खाजगी कांदळवनास 50 मीटर बफ़र झोन संदर्भातील तरतुदी, पाणथळ क्षेत्राबाबतची नियमावली, तक्रारदार यांचा तक्रार अर्ज व पॅन इंडिया पर्यटन प्रा.लि. यांनी सादर केलेले म्हणणे यांचा एकत्रीतपणे विचार करुन निर्णय घेण्यासाठी सर्व संबंधितांची जिल्हास्तरावर बैठक घेवून व गरज भासल्यास शासन स्तरावरुन मार्गदर्शन मागवून पुढील आदेश होणेबाबत उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी विनंती केली आहे.<br>• त्यानुसार, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयात दि. 06 डिसेंबर, 2023 रोजी सर्व संबंधितांची बैठक आयोजित करणेग आली होती. सदर बैठकीत विषयांकीत तक्रारी व पॅन इंडिया प्रा.लि. | 1. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि. 05.06.2023. | यांनी सादर केलेले म्हणणे यानुषंगाने चर्चा करणेत आली. तदनंतर विभागीय वन अधिकारी, कांदळवन संधारण घटक, कुर्ला यांना अहवाल सादर करणेकामी निर्देश केले होते. सदर प्रकरणी वन विभागामार्फत दि. 28 डिसेंबर, 2023 रोजी स्थळपाहणी आयोजित केली असल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अवगत केले होते. परंतु, अद्यापर्यंत वन विभागाने या कार्यालयास अहवाल सादर केलेला नाही.<br>• या प्रकरणी Ministry of Environment of Forest Department यांनी मुंबई, उपनगर जिल्ह्यात एकूण 49 पाणथळ ठिकाणांचे वेटलँड कोड ब्रिफ़ डॉक्युमेंट तयार करुन सदर माहिती आज्ञावलीमध्ये अपलोड करणेकामी कळविण्यात आले होते. त्यानुसार, बोरीवली तालुक्यात MoEF ने दर्शविलेल्या एकूण पाणथळ ठिकाणांपैकी 15 पाणथळ ठिकाणे असून सदर ठिकाणांपैकी एकही पाणथळ ठिकाण वेटलँड म्हणून घोषित करता येण्यासारखे नसलेबाबत तहसीलदार,बोरीवली यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अहवाल सादर केलेला आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 20 | तक्रार क्र. 263 श्री. संतोष पुजारी Land Graber / Land Mafia Bans Bahadur Jaiswal are busy in filling Talav (Pond) with Debris & Encroaching Government Land.<br>दि.20.08.2023. | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाचा दि.30.10.2023 रोजीच्या अहवालानूसार, तक्रारीत नमूद मिळकतीवर कांदळवन किंवा बफर झोन याची हानी झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 कलम 15 (1) व (2) अन्वये कारवाई करता येत नाही. तसेच सदरची जागा खाजगी मालकीची असून, सदर जागेवरील बांधकाम व भरणीबाबत सहा.आयुक्त, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कार्यवाही करणे अभिप्रेत राहील, असे नमूद केले आहे.<br>• याबाबत, मा.अध्यक्ष यांनी बृहन्मुंबई, महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या.<br>• बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.22.12.2023 रोजीच्या अहवालानुसार सर्वे नं. 42 व 41 डी, न.भू.क्र. 2 व 3/ए/1, चारकोप गाव, प्लॉट नं. 806 जवळ, सेक्टर -8, कांदिवली (पश्चिम), मुंबई -67 येथील खाजगी जागेवरील चालू बांधकामास महानगरपालिकेमार्फत महापालिका अधिनियम 1888 कलम 354-ए अन्वये दि.25/04/2023 रोजी नोटीस बजाविण्यात आली असून दि. 26.04.2023 रोजी अंतिम आदेश पारित केले. तद्नंतर सदरचे चालू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.<br>• तसेच, संदर्भित जुन्या अस्तित्वात असलेल्या बांधकामास कलम 351 अन्वये दि. 26.04.2023 रोजी नोटीस बजावून कलम 351 अन्वयेच्या नोटीसच्या अनुषंगाने नोटीसधारकाने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन, अंतिम आदेश पारित करण्यात आले. तथापि, सदर नोटीस व अंतिम आदेशाच्या विरोधात नोटीसधारकाने मा. नगर दिवाणी न्यायालयात एल.सी.सूट क्र.1316 ऑफ 2023 अंतर्गत दावा दाखल केला असून सदर सुनावणीत मा. न्यायालयाने पुढील आदेश मिळेपर्यंत कारवाई करण्यास मनाई केली आहे. सबब, सदर प्रकरण मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने पुढील कार्यवाही मा. न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात येईल असे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | तक्रार क्र. 264 श्री. रेजी अब्राहम Regarding inaugurate "West View Garden" created Post rabid dumping & brazen destruction of Mangroves by rabid dumping & other illegal procedures on notified mangroves forest area admeasuring 5000 odd sq.ft. At charkop Kandivali west. दि.17.08.2023. | • विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.16.10.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर क्षेत्रावर कुठेही कांदळवन दिसून आले नाही. सदर ठिकाणी प्लास्टिक व घनकचरा साफसफाई करून फुटपाथवर कुंड्या ठेवून त्यात झाडे लावलेली आहेत व मोकळ्या जागेत माती भराव करून अंदाजे 30 ते 35 वृक्ष लागवड केलेली आहे. तसेच कांदळवनाला लागून तारेची जाळ व त्यावर हिरवा नेट कापड लावलेला आहे. सदर तक्रार अर्जातील क्षेत्र हे कांदळवनापासून 50 मी. आतील बफर झोन मध्ये येत असल्यामुळे सदर क्षेत्रावर महसूल विभागामार्फत कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सहा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग व तहसीलदार बोरीवली यांना कळविण्यात आलेले आहे.<br>• जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाच्या दि.30.10.2023 रोजीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, सदरचे क्षेत्र कांदळवनापासून 50 मीटरच्या आत येत असल्याने मंडळ अधिकारी यांनी पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 (1) व (2) अन्वये चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0434/2023, दि.13.09.2023 रोजी वेस्ट व्ह्यु सोसायटीचे पदाधिकारी अध्यक्ष, श्रीमती. पुजा सिंग व सचिव, श्री. शांताराम कारडे यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.<br>• याबाबत, मा.अध्यक्ष यांनी पोलिस आयुक्त, मुंबई यांना नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या प्रगतीबाबतचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. बृहन्मुंबई, महानगरपालिका<br>2. पोलिस आयुक्त, मुंबई |
| 22 | तक्रार क्र.269 श्री. सुजाता साळवी Encroachment of Forest Land Mangroves at Kandivali West Plot No. 929/ D-1, Vijeta CHS, Charkop, Sector 9, Kandivali West, Mumbai 400067. दि.09.09.2023 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला यांच्या दि.18.12.2023 रोजीच्या अहवालानुसार तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी केली असता सदर जागेवर कांदळवनालगत 30 x 20 फुट सिमेंटचा कोबा करुन त्यावर बांबू व ताडपत्री (शेड) वापरुन मंदिर बनविण्यात आले आहे. सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन नाही.<br>• 50 मी आतील बफर झोन क्षेत्रात कार्यवाही करण्याचे अधिकार महसूल विभागाकडे आहे. त्यामुळे वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. 1141 दि.31.10.2023 अन्वये अध्यक्ष तालुकास्तरीय कांदळवन समिती तथा उप विभागीय अधिकारी प. उपनगरे व सहा. आयुक्त, आर/मध्य व आर/दक्षिण विभाग बहन्मुंबई महानगरपालिका, तहसीलदार बोरीवली व तक्रारदार श्रीमती सुजाता साळवी यांना त्याबाबत कळविलेले आहे. तसेच दि.18.12.2023 रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986 अंतर्गत कारवाई करणेकरीता कळविण्यात आले आहे.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.12.01.2024 रोजीच्या अहवालानुसार मौजे चारकोप, सेक्टर-9 दहिसर, ता.बोरीवली येथील स.नं.47/अ, सी.टी.एस. 3/अ/1 या मिळकतीवर | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्थळपाहणी केली असता, सदरचे क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतु सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरच्या आत येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्यस्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्यस्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सदर जागेवर कांदळवनालगत 30*20 फुट सिंमेटचा कोबा करुन त्यावर बांबू व ताडपत्री (शेड) वापरुन मंदिर बनवण्यात आले आहे.<br>• तसेच मौजे चारकोप, ता.बोरीवली येथील सर्वे क्र.41/अ, सेक्टर -9, चारकोप, कांदिवली (प), या शासकीय जागेवर अंदाजे सन 2020 पूर्वी श्री. विठ्ठल रुकमिणी मंदिर बांधलेले असून ते कांदळवनापासून 50 मीटरच्या आत आहे. सदर मंदिर हे सचिन गायकवाड यांनी शासकीय जागेवर भरणी करुन लांबी 30*30 फुटाचा सिमेंटचा कोबा करुन त्यावर श्री.विठ्ठल रुक्मीणीची मूर्ती बसवली, श्री. सचिन गायकवाड यांनी कांदळवनालगत बफर झोन मध्ये बांधकाम केल्याने मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0574/23, दि.25.11.2023 नुसार गुन्हा दाखल केला आहे, असे नमुद केले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 23 | तक्रार क्र.273 Bangur Nagar Resident Association दि.12.10.2023.<br>Large Scale destruction of Mangroves and Enchroachment at Bangur Nagar, Goregaon west. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.12.01.2024 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमुद एकूण 06 ठिकाणांबाबत कार्यवाही करणेत आली असून त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.<br>• **तक्रारीत नमूद ठिकाण क्र. 1 :** न.भू.क्र.1 ए/4 ते 1 ए/6 – सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. तसेच सदर ठिकाण खाजगी कांदळवनापासून 50 मी. च्या बाहेर येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली तसेच सद्य:स्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही.<br>• **तक्रारीत नमूद ठिकाण क्र. 2 :** न.भू.क्र. 1 ए/7 – सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही, परंतु सदरचे क्षेत्र हे खाजगी कांदळवन क्षेत्रापासून 50 मी. च्या आत येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली तसेच सद्य:स्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही. सदर ठिकाणी लग्नमंडपासाठी लागणारे साहित्य ठेवलेले आहे. तसेच सदर साहित्य ठेवण्याकरीता तीन गोडाऊन तात्पुरत्या स्वरुपात बनवलेले आहेत. तक्रारीत नमूद मिळकत ही खाजगी मिळकती असून, तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांनी दाखविलेल्या खाजगी जागेवर कांदळवनापासून 50 मीटरचे आत डबर, रॅबीट व प्लॅस्टीक कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचे दिसून आल्याने मंडळ अधिकारी, गोरेगांव यांनी पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 (1) (2) अन्वये बांगुर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.0520/2023 दि.25.09.2023 रोजी गोविंदलाल कन्हैयालाल मालू व इतर 28 यांचेवर गुन्हा दाखल केलेला आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **तक्रारीत नमूद ठिकाण क्र.3 :** न.भू.क्र. १ ए/८ - सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही, परंतु सदरचे क्षेत्र हे MRSAC नकाशानुसार (खाजगी) मढ फ्लॉट पासून 50 मी. च्या आत येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली तसेच सद्य:स्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही. सदर ठिकाणी लग्नकार्यासाठी लागणारे लॉन्स तात्पुरत्या स्वरुपात ठेवलेले आहे. तसेच त्याखाली सिमेंट कॉंक्रिटचा जुना कट्टा आहे. तक्रारीत नमूद मिळकत ही खाजगी मिळकती असून, तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांनी दाखविलेल्या खाजगी जागेवर कांदळवनापासून ५० मीटरचे आत डबर, रॅबीट व प्लॅस्टीक कचरा टाकून पर्यावरणाचा -हास केल्याचे दिसून आल्याने मंडळ अधिकारी, गोरेगांव यांनी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ (१) (२) अन्वये बांगुर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ०५२०/२०२३ दि. २५/०९/२०२३ रोजी गोविंदलाल कन्हैयालाल मालू व इतर २८ यांचेवर गुन्हा दाखल केलेला आहे.<br>• **तक्रारीत नमूद ठिकाण क्र. 4 :** न.भू.क्र. १ ए/९ - सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही, तसेच सदर ठिकाण खाजगी कांदळवनापासुन 50 मी. च्या बाहेर येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली तसेच सद्य:स्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही.<br>• **तक्रारीत नमूद ठिकाण क्र. 5 :** न.भू.क्र. १४/२३ पै. - सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. तसेच सदर ठिकाण खाजगी कांदळवनापासुन 50 मी. च्या बाहेर येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली तसेच सद्यस्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही.<br>• **तक्रारीत नमूद ठिकाण क्र. 6 :** न.भू.क्र. १ ए/५० - सदर क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्राचा भाग नाही, सदरचे क्षेत्र MRSAC नकाशानुसार खाजगी कांदळवनापासुन ५० मी. बाहेर येत आहे. MRSAC नकाशानुसार सन २००५ साली सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्य:स्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही. सदर ठिकाणी भुषण बँक्वेट हॉल तसेच अर्बन स्पोर्ट्स चे बांधकाम आहे, असे नमूद आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 24 | तक्रार क्र. 279 श्री. हर्षद मोरे चारकोप सेक्टर 2 च्या मागे असलेल्या चारकोप पोलीस ठाण्याजवळील चारकोप गावात झोपडपट्टी विकासकांनी अतिक्रमणासाठी कांदळवनाचा नाश केल्याबाबत. दि.08.11.2023 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.12.01.2024 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद क्षेत्र हे मौजे चारकोप, ता.बोरीवली येथील स.क्र.41अ, न.भू.क्र.3 अ/1 सदरचे शासकीय (खाजण) क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतु उपरोक्त नमुद जी.पी.एस.क्र. 1 व 2 हे कांदळवन 50 मीटरच्या आत येत आहे. तसेच MRSAC नकाशानुसार सन 2005 साली सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्य:स्थितीत सदर ठिकाणी कांदळवन नाही. सदर मिळकतीवर अंदाजे 100 ते 150 रोपे लावून वेस्ट व्हयु नावाने गार्डन बनवण्यात आले आहे. तसेच फुटपाथवर कुंडया ठेवून त्यात झाडे लावलेली आहेत. तसेच कांदळवनाकडील बाजूस जाळी बसवलेली असून त्यावर हिरवा कपडा लावण्यात आलेला आहे. प्रकरणी या मिळकतीवर मंडळ अधिकारी बोरीवली यांनी वेस्ट व्हयु सोसायटीचे अध्यक्ष श्रीम.पुजा सिंग व सचिव श्री. शांताराम कारंडे यांच्या विरुध्द चारकोप पोलीस ठाणे येथे पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 15(1) (2) अन्वये दि.13/09/23 रोजी गुन्हा रजिस्टर क्र.0434/2023 नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.<br>• तसेच स.न.39 न.भू.क्र.4 शासकीय (खाजण) ही मिळकत राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतु उपरोक्त मिळकती मधील जी.पी.एस.क्र.1 हे कांदळवनापासून 50 मीटरच्या आत येत आहे व जी.पी.एस. क्र.2 हे MRSAC नकाशानुसार मढ प्लॉट मध्ये येत आहे. तसेच MRSAC नकाशानुसार सन 2005 साली जी.पी.एस.क्र. 1 च्या ठिकाणी कांदळवन नाही. सद्य:स्थितीत जी.पी.एस.क्र.1 व 2 च्या ठिकाणी कांदळवन नाही. कांदळवनालगत अंदाजे 30 ते 35 झोपड्या आहेत. तसेच कांदळवन संरक्षण भिंतीला लागून भराव करुन सपाटीकरण केलेले आहे. प्रकरणी या मिळकतीवर मंडळ अधिकारी बोरीवली यांनी श्री. सुनिल वर्मा व इतर 12 यांच्या विरुध्द चारकोप पोलीस ठाणे येथे पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 (1) (2) अन्वये दि.30.06.2023 रोजी गुन्हा रजिस्टर क्र. 0259/2023 नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, असे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी यांच्या दि. 18 जानेवारी, 2024 च्या अहवालात मौजे चारकोप येथील स. क्र. 4/अ, न.भु.क्र.3/अ/1 व स.क्र.39, न.भु.क्र.4 बाबत 50 मी. आतील बफर झोन क्षेत्रात कार्यवाही करण्याचे अधिकार महसूल विभागाकडे आहे. त्यामुळे वनक्षेत्रपाल, पश्चिम मुंबई यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. 1417, दिनांक 23 डिसेंबर, 2023 अन्वये बृहन्मुंबई, महानगरपालिका आर/दक्षिण विभाग, तहसिलदार बोरीवली व तक्रारदार श्री. हर्षद मोरे यांना त्याबाबत कळविले आहे. तसेच, मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986 अंतर्गत कारवाई करणेकरीता पत्राने कळविण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले आहे.<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 25 | तक्रार क्र.284 श्री. शिवा रामण्णा शेट्टी दि.15.12.2023.<br>संवेदनशील क्षेत्राजवळ कांदळवन असलेल्या ठिकाणी कांदळवनाची व नैसर्गिक संपतीचे नुकसान करुन अनधिकृत व बेकायदेशीर उभारण्यात आलेल्या स्टुडियोवर तोडक कार्यवाही होऊन फौजदारी गुन्हा दाखल होणेबाबत. | • **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक** 19.12.2023 **रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.**<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. कुर्ला |
| 26 | तक्रार क्र.285 श्री. बापू जगधने अनधिकृतपणे कांदळवनाची मोठया प्रमाणे कत्तल करुन त्याठिकाणी मोठे | • **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 21.12.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | बांधकाम होत आहे याची गंभीर नोंद घेऊन कडक कारवाई होणे बाबत. दि.15.12.2023. | • **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला |
| 27 | तक्रार क्र.291 श्री. स्टॅलिन डी. Blocking of tide water, dumping in CRZ, Possible land grab of Govt land along JVLR at Kanjurmarg. | • **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 17.01.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.**<br>• **सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला |

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **ठाणे जिल्ह्यातील कांदळवन तक्रारी** | |
| 28 | तक्रार क्र. 17 श्री. धिरज परब, दि.05.12.2018<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मिरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • जिल्हाधिकारी ठाणे यांचे दि.06.06.2022 रोजीच्या प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता, विषयांकित प्रकरणी उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग, ठाणे यांच्या वस्तुस्थितीदर्शक अहवालानुसार मौजे नवघर, ता. जि. ठाणे येथे कांदळवनाचा ऱ्हास झाला म्हणून यापूर्वी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सर्व्हे क्र.51 हि. क्र.1, 2, 4/अ व 4/ब, सर्व्हे क्रमांक 68 हि. क्रमांक 1 व 3 व सर्व्हे क्रमांक 69 हि.क्र.1 या जागेवर झालेल्या विकासकामांबाबत संबंधितांवर मिरा-रोड पोलीस ठाणे येथे प्रभाग समिती कार्यालय क्र.04 चे सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांच्यामार्फत पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 अन्वये गुन्हा रजि. नं. 0224/2021 दि.18.06.2021 रोजी गुन्हा दाखल करणेत आले असल्याचे नमूद केले आहे. सोबत गुन्हा नोंद केल्याची प्रत जोडून देण्यात आली आहे.<br>• याबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. 5 डिसेंबर, 2023 रोजी तक्रारदार श्री. धिरज परब यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांनी दि.10.06.2021 च्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी करण्यात आली असून स्थळपाहणीदरम्यान कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत निदर्शनास आल्याने तलाठी साझा नवघर यांचेमार्फत महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा 1986 चे कलम 15 व 19 अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी, ठाणे |
| 29 | तक्रार क्र.9 श्री. जयेश गुप्ता – दि.24.11.2018<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe - Desai - Khardi, Thane. | • ठाणे महानगरपालिकेच्या दि.01.03.2023 रोजीच्या पुन:श्च प्राप्त अहवालानुसार मौजे खर्डी, दिवा येथील खाजगी मालकीचे भूखंड क्र.३७,३७,५०,५५, व ६१ यावर स्थानिक नागरीकांमार्फत मोठे खड्डे करण्यात आलेले होते त्या ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथे लिचेट संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती व संकलित लिचेटची विल्हेवाट कौसा सांडपाणी प्रकिया केंद्र येथे लावण्यात येत होती. सदर खाडीमध्ये मासे मेल्याची कोणतीही तक्रार ठाणे महानगरपालिकेकडे प्राप्त नाही. पालिकेतर्फे दि.31.01.2023 पासून दिवा डम्पिंग ग्राउंड बंद करण्यात आलेले आहे तसेच मौजे भंडार्ली येथे घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथील Legacy | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला. |
| 30 | तक्रार क्र. 201 श्री. स्टॅलिन डी. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | Illegal dumping of waste in CRZ, pollution of air and water.<br>Illegal Sand Mining.<br>Date : 29.09.2022 | Waste बाबत शासन निर्णयानुसार बायोरेमिडीएशन प्रकिया करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथील धुराचा त्रास कमी करण्यासाठी कायम स्वरूपी पाण्याच्या tanker ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पालिकेतर्फे 1200 TPD प्रती क्षमतेचा Waste to Energy प्रकल्पाचा टप्पा मार्च 2023 मध्ये सुरु करण्यात येत असून दुसरा टप्पा विजनिर्मिती डिसेंबर 2023 मध्ये सुरु करण्यात येणार आहे असे नमुद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी यांच्या दि.06.04.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जातील ठिकाण अधिसूचित कांदळवन क्षेत्र असल्यामुळे रौ.गु.क्र.-03/2023 दि.01.02.2023 अन्वये वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही चालू असल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना या तक्रारीबाबतचा अंतिम अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना तक्रारीबाबतचा अंतिम अहवाल पुढील बैठकीपूर्वी 15 दिवसात समितीस सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 31 | तक्रार क्र. 76 श्री. धिरज परब:- भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत.<br>दि.23.04.2018 | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.01.03.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. सदर तक्रारीतील नमूद जागेवर 2005 साली कांदळवन नाही. परंतु सद्यस्थितीत सदर ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. तसेच सदर जागेवर डेब्रीज टाकून सपाटीकरण करून वाहन पार्किंगकरीता त्या जागेचा वापर करत असल्याचे दिसून येत आहे.<br>• कांदळवनांचा ऱ्हास झाल्या प्रकरणी कांदळवन (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये श्री. रामचंद्र जे. वैष्णव, श्री.श्यामसुंदर राधेशाम अग्रवाल, श्री. शुभम मुरलीधर अग्रवाल यांचे विरुध्द भाईंदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र.23/2020 दि.30.01.2020 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर ठिकाणी स्थळ पाहणी केली असता जे.सी.बी.च्या सहाय्याने जमिनीचे सपाटीकरण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदरची जमिन कांदळवन क्षेत्राच्या 50 मीटर बफर झोनमध्ये बाधित होत असून त्या ठिकाणी नव्याने माती भराव व कांदळवन झाडांची कत्तल झाल्याचे आढळून आलेले नाही. तसेच त्या ठिकाणी जे.सी.बी. च्या सहाय्याने सुकलेली झाडे साफ केल्याचे निदर्शनास आले आहे असे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर जागा खासगी आहे किंवा सरकारी या बाबत पडताळणी करावी तसेच आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिज काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी तसेच सदर जागेवर कांदळवनाची पुर्नःलागवड (Restoration) करण्याचे मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले होते. | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • याबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनुसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.5 डिसेंबर, 2023 रोजी तक्रारदार श्री.धिरज परब यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या स्थळपाहणी दरम्यान सदरची जागा ही खाजगी स्वरुपाची असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच सदर तक्रारीचे अनुषंगाने महाराष्ट पर्यावरण संरक्षण कायदा 1986 चे कलम 15 व 19 अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | |
| 32 | तक्रार क्र. 77 श्री. धिरज परब:- मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील मिरा रोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळचा ऱ्हास करून CRZ चे उल्लंघन. दि.11.06.2018 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जातील नमुद क्षेत्र हे मौजे भाईंदर स.नं.147, 151 व 146 मधील आहे. सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. सद्यस्थितीत काही भागात तिवर व मेस्वाक ही कांदळवनाची झाडे आहेत व काही जागेवर चाळीचे बांधकाम केलेले दिसून येत आहे. सदर क्षेत्र खाजगी व सरकारी असल्याने महसूल खात्याने त्यावर कार्यवाही करावी.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर डेब्रिज / माती भराव काढणेबाबत अंदाजपत्रक तयार करणेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत करण्यात येणार आहे असे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• याबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.5 डिसेंबर, 2023 रोजी तक्रारदार श्री.धिरज परब यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करण्यात आली असून स्थळपाहणीदरम्यान कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत निदर्शनास आल्याने तलाठी साझा नवघर यांचेमार्फत महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा 1986 चे कलम 15 व 19 अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 33 | तक्रार क्र. 104 श्री. धिरज परब दि.19.11.2019.<br>भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट केलेबाबत तसेच बेकायदा डेब्रिस चा भराव व थर्माकोल आदींचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास प्रकरणी. | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.01.03.2023 रोजीच्या अहवालानुसार सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमूद जागेवर काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. सद्यस्थितीत मौजे भाईंदर स.क्र.342/1 ही जागा सरकारी असून, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यासाठी आरक्षित आहे. स.क्र.342/1 च्या एकूण क्षेत्रापैकी 103.8320 हे. क्षेत्र भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 4 नुसार राखीव कांदळवन म्हणून घोषित केले आहे. कांदळवनांचा ऱ्हास झाला असल्याचे नमूद केले आहे.<br>• तसेच सदरची जागा मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अखत्यारीत असल्याने सदर ठिकाणी झालेला माती भराव काढून टाकणे, कुंपण गेट तयार करुन महापालिकेचे सुरक्षा रक्षक तैनात करणे तसेच सदर जागेत खाजगी वाहनांची पार्किंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर जागेवर सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांच्या बसेस पार्कींग केली जात असल्याचे व त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांचेमार्फत सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• याबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. 5 डिसेंबर, 2023 रोजी तक्रारदार श्री.धिरज परब यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करणेत आली असून स्थळपाहणी दरम्यान कांदळवनांचा ऱ्हास झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. तक्रारीतील नमूद क्षेत्र हे भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 4 अन्वये राखीव वने म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याचे तसेच सदरचे क्षेत्र हे कांदळवन कक्षास हस्तांतरीत करणेत आलेले असल्याने प्रकरणी पुढील कार्यवाही ही कांदळवन कक्षाकडून होणे अपेक्षित आहे. सदरची तक्रार ही कांदळवन कक्ष विभागाकडे वर्ग करुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने कांदळवन कक्ष यांचेकडून अहवाल घेण्यात यावा असे नमूद केले आहे.<br>• परंतु विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला यांच्या दि.23.11.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही. तसेच बफर झोन मध्ये येत आहे. सदरचे ठिकाण हे भाईंदर पश्चिम येथे स.नं.342/1 पै ही जागा सरकारी असून महाराष्ट्र राज्य परिवहन | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>3. आगार व्यवस्थापक, परिवहन मंडळ, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महामंडळ यासाठी आरक्षित आहे. **तसेच स.नं.342/1 यातील काही भाग अधिसुचित राखीव कांदळवन म्हणून घोषित करण्यात आलेला आहे.**<br>• सन 2005 साली नमूद जागेवर काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. परंतु सदर जागेवर भराव केल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल ठाणे यांनी दि.23.09.2022 रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, मिरा-भाईंदर यांना याबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **वनक्षेत्रपाल,ठाणे यांनी दि. 23 सप्टेंबर, 2022 रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, मिरा-भाईंदर यांना कळविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 34 | तक्रार क्र.150 श्री. स्टॅलिन डी. दि.09.04.2021 Apparent Land grab, illegal construction and destruction of Mangroves, Coastal wetlands and CRZ 1 areas at Dive region. Illegal construction of cement mixing plant at Dive. | • विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.27.10.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीमधील नमूद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमूद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीतही नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी, भिवंडी यांच्या दि.23.08.2023 रोजीच्या अहवालानुसार मौजे दिवे अंजुर ता. भिवंडी येथील स.नं.180 पै या जागेवरील गणेशघाट ते स्मशानभुमी (सिमेंट क्रॉक्रीटची पायवाट) लगत डाव्याबाजुस कांदळवन दिसून येते. तसेच स.नं. 237 पै या जागेवर भारती इन्फ्रास्ट्रक्चर व कोणार्क स्टक्चर RMC Plant चे बांधकाम दिसून येते. महसूल व वनविभागाकडील दि.11.01.2021 रोजीच्या अधिसूचनेनुसार स.नं.180/ब मधील क्षेत्र 10.72.66 हे.आर राखीव वने म्हणून घोषित करणेत आले आहे. तरी सदरचे गाव हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदर प्राधिकरणाकडून कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.<br>• मौजे दिवे अंजुर ता. भिवंडी येथील स.नं.180 व 237 या जागेची हदद निश्चिती नसल्याने सदर जागेलगत असलेल्या भारती इन्फ्रास्ट्रक्चर व कोणार्क स्टक्चर RMC Plant धारकांवर वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी E-4/2021-22 दि.23.04.2021 अन्वये गुन्हा दाखल करणेत आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी 15 दिवसात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमूद ठिकाणाची स्थळपाहणी करणेत आली असून स्थळपाहणी दरम्यान | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदरचे क्षेत्र हे राखीव वने म्हणून घोषित झाल्याचे दिसून आले. प्रकरणी कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे यांचेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | |
| 35<br><br><br><br><br>36 | तक्रार क्र. 153 श्री.रोहीत जोशी दि.17.06.2021<br>Huge reclamation of creek at Mumbra-Diva<br><br>तक्रार क्र. 192 श्री. गणेश पाटील – दि.13.07.2022<br>मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान करुन मौजे दिवा येथे आदित्य गोयल यांच्या जमिनीतील मॅग्रोजच्या झाडांची कत्तल व पर्यावरणाची हानी करुन होत असलेल्या बेकायदेशीर रेती उत्खननाबाबत. | • ठाणे महानगरपालिका यांच्या दि.25.10.2022 रोजीच्या अहवालानूसार सदर स्थळाची दि.25.06.2022 रोजी पाहणी केली असता, सदरचा रस्ता हा दिवा प्रभाग समिती अंतर्गत नव्याने घटीत झालेल्या प्रभाग क्र.43 मध्ये येत आहे. या परिसरात काही ठिकाणी चुहा ब्रिजच्या बाजूला डेब्रिजची भरणी केल्याचे आढळले. या रस्त्याच्या काही भूखंडाची **मालकी वन विभागाची** असल्याचे जागेवर लावलेल्या जाहिरात फलकावरुन दिसून येते. तरी सदर प्रकरणी आवश्यकती कार्यवाही करण्याकरिता **वन विभागास निर्देश देणे** उचित असल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.23.11.2022 रोजीच्या अहवालानूसार नमूद क्षेत्रापैकी मौजे दिवा स.क्र.236 मध्ये काही भागात अंदाजे 2.45 हेक्टर राखीव कांदळवन क्षेत्रात सिमेंट, विटा, रेती या डेब्रीजचा कचरा टाकल्याने व सदर ठिकाणी मोठी भिंत बांधून पाम क्रिक हॉटेल बांधल्याने श्री. गणेश निळकंठ पाटील यांचे विरुध्द वनक्षेत्रपाल ठाणे यांनी वनगुन्हा नोंदविला आहे. सदर अतिक्रमणातील भिंत व काही भाग दि.02.11.2022 रोजी निष्कासित करण्यात आले असून सदर क्षेत्राची हद्द निश्चित झाल्यानंतर उर्वरित क्षेत्रातील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करणेत येईल.<br>• तसेच अधिसुचित क्षेत्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी झालेल्या रेती उत्खननाबाबत तहसिलदार, ठाणे यांना संयुक्त स्थळपाहणी करुन कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• तथापि, तक्रार क्र.192 श्री. गणेश पाटील यांच्या तक्रारच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी 15 दिवसात सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• **सदर प्रकरणी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. |
| 37 | तक्रार क्र. 170 श्री. अमजद खान – दि.21.02.2022 – मौजे पेणकरपाडा ता. जि. ठाणे जु.स.नं.२०६, नवीन सं.नं. ३८/२ या जागेवर कांदळवनापासून ५० मी. परिसरात कांदळवनाची कत्तल व भरणी करुन, | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार कांदळवनाचा ऱ्हास झाला असून या कार्यालयाचे पत्र दि. 22.06.2023 नूसार मंडळ अधिकारी, भाईंदर यांना संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे पेणकरपाडा ता.जि.ठाणे जु.स.नं.206, नवीन सं. न. 38/2 येथील आहे. तक्रारीमधील नमुद क्षेत्र | 1. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | त्यावर विकासक / भुमाफिया यांनी अनधिकृतरित्या कांदळवनालगत पत्र्याचे कुंपण करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केल्याबाबत. | अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमुद क्षेत्र खाजगी कांदळवन आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत आहे. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. सदर जागेत दगड मातीची भराव टाकून सपाटीकरण केलेले आहे. या जागेच्या चारही बाजूचा विटांच्या भिंती बांधून आत मध्ये तीन ते चार झोपडया बांधलेल्या दिसून येत आहे. तसेच या जागेच्या भिंतीला लागूनच जाफरी खाडीचे पात्र असून या खाडी मध्ये अविसिनिया मरिना या प्रजातीची मोठया उंचीची झाडे आहेत. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• मिरा – भाईंदर महानगरपालिका यांचे दि.30.06.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार, सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास, अतिक्रमण होऊ नये व सदर ठिकाणी नाल्यास लागून नागरिकांमार्फत कचरा / डेब्रिज टाकू नये तसेच सदरचा परिसर स्वच्छ राहणेकामी मिरा- भाईंदर महानगरपालिकेमार्फत कांदळवन क्षेत्रास हानी न होता रस्त्यास लागून पत्र्याचे तात्पुरते कुंपण बांधुन, कांदळवन संरक्षित करण्यात आलेले असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• याबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. 5 डिसेंबर, 2023 रोजी तक्रारदार श्री.अमजद खान यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद ठिकाणाची स्थळपाहणी करण्यात आली असून स्थळपाहणी दरम्यान कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले आहे. प्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत अपर तहसिलदार, मिरा भाईंदर यांचे कार्यालयामार्फत मंडळ अधिकारी, भाईंदर यांना कळविण्यात आलेले आहे. प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, सोबत FIR ची प्रत जोडली असल्याचे नमूद केले आहे.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | |
| 38 | तक्रार क्र. 172 श्री. अमजद खान – दि.21.02.2022 – मौजे घोडबंदर ता. जि. ठाणे येथील स.नं. २० ते २५, १११, | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन नाही. सदरच्या सर्व्हे क्रमांकामध्ये सद्यस्थितीत जागेवर खूप मोठ्या प्रमाणात दगड मातीची भरणी करुन इमारतीचे बांधकाम चालू असल्याचे दिसून आले. इमारत बांधकामासाठी लागणारे पाणी साठवण्यासाठी लहान लहान तलाव खोदले असून, या संपूर्ण परिसरात आजूबाजूला | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | ११२, ११७, ११८, ११९, १२५ व १२६ या जागेवर कांदळवनापासून ५० मी. परिसरात कांदळवनाचा ऱ्हास, सीआरझेड चे उल्लंघन करुन मे.जे.पी. इन्फ्रा या विकासकामार्फत इमारतीचे बांधकाम केलेबाबत. | बांधकाम साहित्य टाकलेले आढळून आले या जागेच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारची कांदळवनाची झाडे दिसून आली नाहीत. आजूबाजूस कोणत्याही प्रकारची पाणथळ जागा दिसून आली. परंतु इमारतीच्या एका भागात भिंती लगत मिसवाक या कांदळवन सहयोगी वनस्पतीचे 2 फुटांचे रोप आढळून आले. परंतु सदर क्षेत्राचे जीपीएस निर्देशांक गुगल अर्थच्या सहाय्याने 2005 सालाच्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता सदर जागा ही शेतीसाठी वापरत असल्याचे दिसते व शेजारी पाणथळ जागा असल्याचे दिसून येत असून कांदळवनाचा ऱ्हास झाला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे घोडबंदर, ता.जि. ठाणे येथील स.नं.20 ते 25, 111, 112, 117, 118, 119, 125 व 126 येथील आहे. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. सदरच्या सर्व क्रमांकामध्ये सद्यस्थितीत जागेवर खूप मोठया प्रमाणात दगड मातीची भरणी करुन इमारतीचे बांधकाम चालू असल्याचे दिसून आले. इमारत बांधकामासाठी लागणारे पाणी साठवण्यासाठी लहान लहान तलाव खोदले असून या संपूर्ण परिसरात आजूबाजूला बांधकामाचे साहित्य टाकलेले आढळून आले. या जागेच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारची कांदळवनाची झाडे दिसून आली नाहीत. परंतु इमारतीच्या एका भागात भिंती लगत मिसवाक ही कांदळवन सहयोगी रोप आढळून आले. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• याबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनूसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. 5 डिसेंबर, 2023 रोजी तक्रारदार श्री.अमजद खान यांच्यासमवेत बैठक आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करणेत आली असून स्थळपाहणी दरम्यान कांदळवनांचा ऱ्हास झाल्याचे दिसून आलेले नाही. सोबत तहसीलदार, मिरा भाईंदर यांचेकडील अहवालाची प्रत जोडली आहे. सबब सदरची तक्रार निकाली काढणेस विनंती करण्यात आली आहे.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | 2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 65 | तक्रार क्र.280<br>श्री. आरिफ नवाझ ईराकी<br>संबंधित अधिकारी यांचेवर सर्व्हे क्रमांक 50, 119, 129 मध्ये जमिनीची बेकायदेशीर पुर्नरचना रोखण्यासाठी पर्यावरण उत्पादन कायदा, 1986 आणि CRZ कायदा 2011 नुसार कार्यवाही सुरु करणे तसेच, इतर मुंब्रा आणि सर्व्हे 25 मध्ये सीआरझेड क्षेत्रातील नवीन सीझेडएममी सीमांकन करण्यात आल्याने खारफुटीचा नाश झालेबाबत. | • या प्रकरणी संबंधितांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुन:श्च सूचना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे दि.22.12.2023 रोजीच्या अहवालानुसार मौजे मुंब्रा सर्व्हे क्र. 50 हे खाजगी क्षेत्र असून आरक्षणाने बाधित भुखंडावर Accommodation Reservation अंतर्गत CRZ क्षेत्र वगळून परवानगी देण्यात आलेली आहे. सर्व्हे क्र. 119 हे खाजगी क्षेत्र असून आरक्षणाने बाधित भुखंडावर Accommodation Reservation अंतर्गत CRZ क्षेत्र वगळून परवानगी देण्यात आलेली आहे. उर्वरीत क्षेत्र रहिवास झोनमध्ये असून सदर क्षेत्रावर बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. सर्व्हे क्र.129 हे खाजगी क्षेत्र असून सदर भुखंडावर बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.<br>• तसेच मौजे सोनखार येथील सर्व्हे क्र.25 हे सरकारी क्षेत्र असून सदर भुखंडावर बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. सर्व्हे क्र.57 हे खाजगी क्षेत्र असून सदर भुखंडावर बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. सर्व्हे क्र.58 हे खाजगी क्षेत्र असून सदर भुखंडाचे रहिवास क्षेत्रावर नियमानुसार बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.<br>• ठाणे महानगरपालिकेने नियमानुसार CRZ क्षेत्र वगळून बांधकाम परवानगी नियमानुसार काही (50, 119, 58) क्षेत्रावर दिलेली आहे. उर्वरीत (129, 25, 57) खाजगी क्षेत्रावर ठाणे महानगरपालिकेने परवानगी दिलेली नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा पुरवणी अहवाल 7 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. ठाणे महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3.विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला |
| 66 | तक्रार क्र.281 श्री.धिरज परब<br>मीरा भाईंदर शहराची सुधारित विकास योजना नकाशे बाबत संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन प्रशासकीय कारवाई करणे तसेच कांदळवन क्षेत्र व बफर झोन विकास आराखडयात नोंद करुन निवासी झोन, रस्ता आदी केलेला बदल रद्द करणे. दि.24.11.2023 | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 14.12.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. अद्याप अहवाल अप्राप्त आहे.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3.विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| 67 | तक्रार क्र.282 श्री. रोहित जोशी<br>Destruction of Wetland and Mangroves at Kasheli<br>दि.29.11.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 05.12.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.<br>• ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या दि.29.12.2023 रोजीच्या पत्रानुसार तक्रारीत नमुद ठिकाण ठाणे महानगरपालिकेच्या यादीतून वगळण्यात येण्याबाबत कळविले आहे.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2.विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला |
| 68 | तक्रार क्र.286 श्री. अमिताभ सिंग, श्री.अप्पासाहेब नुली, श्री. प्रदिप पाटोळे, श्री. सुनिल अग्रवाल, श्री. रोहित जोशी.<br>Destruction of Mangroves at TSC, Navi Mumbai area.<br>दि.26.12.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 02.01.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापि, अहवाल अप्राप्त आहे.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. ठाणे महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **रायगड जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 69 | तक्रार क्र. 149 श्री. स्टॅलिन डी. दि.15.04.2021<br>Multiple CRZ violations, dumping of garbage and debris in Mangrove areas at Alibag. | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि.21.06.2022 रोजीच्या अहवालानुसार समितीने सदरचे ठिकाण गुगल अर्थद्वारे तपासले असता, तक्रारीत नमूद G.P.S रिडींगनूसार अहवाल सादर झाला नसल्याने पुन्हा स्थळ पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांनी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडून अहवाल प्रलंबित असल्याचे सांगितले.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी तक्रादारासमवेत संयुक्त स्थळपहाणी करुन केलेला कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारींवर कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, रायगड |
| 70 | तक्रार क्र. 188 श्री. महेश आठवले, दि.20.05.2022<br>बागमळा ता. अलिबाग येथे खाड्या बुजविणे व खाडी किनारीची mangrove नष्ट करणे, पाणथळ जागांवर भराव, Intertidal zone मधे भराव करणे. | • जिल्हाधिकारी रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांचे दि.11.12.2023 रोजीच्या अहवालानूसार मौजे बागमळा, नागाव ता. अलिबाग येथील गट नंबर 18/1, 18/2, 18/3, 31, 32, 35, 249, 122, 123, 110, 263, 197, 251, 26, 27, 240, 29, 30, 33, 34, 13, 14, 15, 16 व 36 ह्या मिळकती डायनामिक्स व्हेकेशन रिसॉर्ट प्रा.लि. यांचे नावे दाखल आहेत.<br>• तक्रारदार यांच्या अर्जात उल्लेखित खाडीची पाहणी केली असता, सदर ठिकाणी स्थानिक भाषेत नाला असे संबोधतात. सदर नाल्याची पूर्ण पाहणी केली असता, त्याचे पाणी कोठेही अडल्याचे दिसून येत नाही. सदर नाल्याच्या दोन्ही काठास गवत उगवलेले दिसून येत असून, त्याच्या काठी किंवा बाजुस कोठेही भराव केल्याचे येत नाही. सदर ठिकाणी पूर्वी शेती करत असून आजमितीस त्या ठिकाणी ओसाड जागेवर गवत वाढलेले दिसून येत आहे. सदर भागात कोठेही मॅग्रोजची तोड झाल्याचे दिसून येत नाही. तसेच उर्वरित गट नंबरच्या मिळकतीची पहाणी केली असता, सर्वावर फक्त गवत दिसून येत असून, सदर मिळकतीत अंतर्गत रस्त्याकरीता भराव केल्याचे दिसून येत आहे. परंतु सदर रस्त्यावर गवत उगवलेले असल्यामुळे सदरचा भराव हा पूर्वीचा असल्याचे दिसून येते. तसेच सदर भागात कुठेही पाणी | जिल्हाधिकारी, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तुंबून असल्याचे अगर गावातून वाहत येणारे पाणी या भागात साठून राहिल्याचे दिसून येत नाही. सदर बाबत कंपनीच्या प्रतिनिधींना विचारले असता, त्यांनी सदर रहिवाशी प्रकल्पासाठी कंपनीने शासनाच्या सर्व नियमांच्या आवश्यक त्या परवानग्या घेतलेल्या असून, सदर प्रकल्प शासनाने मंजूर केला असल्याचे तहसिलदार अलिबाग यांनी या कार्यालयास कळविले आहे.<br>• तसेच मौजे बागमळा येथील सदर क्षेत्राबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, अलिबाग यांनी गुगल हिस्टोरीकचे उपलब्ध असलेल्या इमेजेसचे अवलोकन केले असता, सदर इमेजेस ह्या 2011 पासून उपलब्ध आहेत. त्याचे विश्लेषण करावयाचे झाल्यास सदर तक्रारीत अल्लेखीत भागात मॅग्रोव्हजचे अस्तित्व दिसून येत नाहीत. तसेच भागाचे जिपीएस रिडींग N 18.59160 E 72.9197 असे आहे. तरी, तक्रारदार यांनी केलेल्या तक्रार अर्जातील वस्तुस्थिती ही खरी नसल्याने त्यांचा तक्रार अर्ज निकाली काढणेस विनंती केली आहे.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | |
| 71 | तक्रार क्र. 143 श्री. स्टॅलिन डी. दि.08.02.2021 Mangroves destroyed and road made, tide water blocked At Taloja phata. | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.08.09.2022 रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने तक्रारीत नमूद ठिकाण गुगल अर्थद्वारे तपासले असता सदरचा रस्ता 2018 पासून कांदळवन नष्ट करुन माती भराव टाकून पायवाटीचे रस्त्यामध्ये रुपांतरण झाल्याचे दिसून येत असल्याचे समितीचे अशासकीय सदस्य श्री. स्टॅलिन डी. यांनी नमूद केले होते.<br>• प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांना सदर ठिकाणी MRSAC images च्या सहाय्याने पुन:श्च स्थळपाहणीकरुन समितीस अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.11.12.2023 रोजीच्या अहवालानुसार, तक्रारदार यांनी समक्ष सांगितल्यानुसार प्रत्यक्ष स्थळी उत्खनन पुर्णपणे बंद असून कांदळवनाचे पाणी वाहून जाण्यासाठी पाईप टाकण्यात यावे असे सांगितले. कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या वेळी दिसून आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **त्यानुसार, जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी, रायगड |
| 72 | तक्रार क्र. 191 Pradeep Patole – दि.11.07.2022<br>Destruction of Mangroves in Kharghar near Toll Naka | • जिल्हाधिकारी, रायगड यांचे दि.09.09.2022 रोजीच्या अहवालानुसार मंडळ अधिकारी, तळोजे यांनी दि.27.07.2022 रोजी मौजे खारघर येथील टोलनाक्याजवळ पाहणी केली असता, टोल नाक्याच्या आसपास कोठेही कांदळवन वनस्पतीचा ऱ्हास किंवा तोड झाल्याचे दिसून आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांचे दि.27.10.2022 रोजीच्या अहवालानूसार सदरचे क्षेत्र हे सिडको | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभागाच्या अखत्यारित येत असल्याने वनक्षेत्रपाल नवी मुंबई यांनी दि.24.08.2022 रोजीच्या पत्रान्वये सिडको विभाग यांना कारवाई करणेबाबत कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार कार्यकारी अभियंता (खारघर), सिडको विभागाने दि.28.09.2023, दि.10.03.2023, दि.14.07.2023 रोजी स्थळ पाहणी केली होती. सद्यस्थितीत निवारणाचा उपाय म्हणून त्याबद्दल खारघर पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी सिडकोकडून सदर ठिकाणी कांदळवनाची पुर्न:लागवड (Restoration) करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी सिडकोकडून सदर ठिकाणी कांदळवनाची पुर्न:लागवड (Restoration) करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 73 | तक्रार क्र. 195 श्री.स्टॅलिन डी – दि.08.08.2022<br>ILLEGAL SAND MINING KILLING MANGROVES IN TALOJA CREEK/BUNDS KILLING MANGROVES AT KAMOTE | • विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.21.12.2022 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे कामोठे स.नं. 56 व 368 येथील असून अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही. नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्राव्यतिरिक्त असल्याने वनक्षेत्रपाल नवी मुंबई यांचे दि.02.11.2022 रोजीच्या पत्रान्वये वनपरिक्षेत्र अधिकारी, पनवेल व महाव्यवस्थापक, सिडको यांना कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• सिडको यांच्या दि. 06.06.2023 रोजीच्या अहवालानूसार जागोजागी मातीचे बांध तोडण्यात आलेले असून त्यामुळे भरती ओहोटीचे पाणी अडत नसल्याचे निर्दशनास आले व कांदळवानाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही. तसेच कांदळवनाचा ऱ्हास होऊ नये यासाठी सदर विभागाकडून भविष्यात कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येईल असे नमूद केले आहे.<br>• जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.14.07.2023 रोजीच्या अहवालानूसार मौजे कामोठे ता. पनवेल येथील सर्व्हे क्रमांक 56 मध्ये कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्याने पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15(1) अन्वये अज्ञात व्यक्ती विरुध्द कामोठे पोलिस ठाणे येथे गुन्हा क्र.0220 दिनांक 09.09.2022 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• त्याअनुषंगाने समितीने सदरची जागा गुगल अर्थद्वारे तपासली असता, सदर ठिकाणी होणारे वाळू उत्खनन ताबडतोब थांबवून जागेचे Restoration करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांनी सिडकोकडून सदर ठिकाणी कांदळवनाची पुर्न:लागवड (Restoration) करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या. | 1. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. जिल्हाधिकारी, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | |
| 74 | तक्रार क्र.211 श्री.गणेश प्रभाकर मिरजणकर, रायगड दि.03.02.2023 मॅग्रोजची कत्तल करुन चालु असलेले बेकायदेशीर भरावाचे काम त्वरीत थांबवून सर्व संबंधितांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन कायदेशीररित्या सक्त कारवाई करणेबाबत. | • जिल्हाधिकारी रायगड यांचे अहवालानूसार, सदर क्षेत्राचा घेण्यात आलेला GPS पॉलिगॉन गुगल ईमेज सन 2005 ते 2022 पर्यंत तसेच MRSAC नकाशाचे अवलोकन केले असता, सदर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात कांदळवन रोपे तोड करण्यात आलेली आहेत हे स्पष्ट होते. सद्यस्थितीत सदर जागेवर मोठ्या प्रमाणात माती-मुरुमच्या भरावाखाली कांदळवन मोठ्या प्रमाणात नष्ट केल्याचे दिसून येत आहे. भविष्यामध्ये तेथे अजुन कांदळवन रोपांची कत्तल तसेच मातीचा भराव करण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• कांदळवनाचा ऱ्हास झालेला असल्यामुळे श्री. प्रकाश बाबु सरपाटील, जि. रायगड यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 अन्वये, मुरुड पोलिस ठाणे येथे F.I.R No. 0111/2023 दि. 10.07.2023 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांनी कांदळवन क्षेत्रातील भराव काढण्याबाबत जिल्हापरिषद रायगड यांना निर्देश दयावेत व अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, रायगड |
| 75 | तक्रार क्र.212 श्री.प्रदिप पाटोले, रायगड दि.07.02.2023<br>1. Dumping of Debris in Sector 17, Sector 27, Sector 25 on Wetland and Mangroves.<br>2. Mangrove and wetland near Yogadan Port are been killed. | • सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार खारघर सेक्टर 17 मधील सिडको अंतर्गत होल्डिंग पॉन्ड हे पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले आहे आणि रस्त्याच्या बाजूस पडलेल्या डेब्रिज संबंधीत पनवेल महानगरपालिकेशी पत्र व्यवहार केलेला आहे.<br>• सेक्टर – 25 मधील सिडको अंतर्गत होल्डिंग पॉन्ड येथे कार्यकारी अभियंता (खारघर), सिडको विभागाने दि.27.11.2022, दि.09.01.2023, दि.30.01.2023, दि.13.02.2023, दि.14.07.2023 रोजी स्थळ पाहणी केली होती. सदरील प्लॉटवर बेकायदेशीरपणे डेब्रिज डंपिग केल्याबद्दल खारघर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी अनु क्र.2 ची तक्रार ही सिडको कार्यालयाच्या अखत्यारीत नसल्याचे मुख्य नियोजनकार, सिडको यांनी सांगितले.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड व पनवेल, महानगरपालिका यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• त्यानुषंगाने, पनवेल महानगरपालिका यांचे दि.09.10.2023 रोजीच्या अहवालानुसार खारघर येथील सेक्टर 17 मधील होल्डींग पॉन्ड हे पनवेल महानगरपालिकेला हस्तांतरीत झाले असून सदर ठिकाणी दि.25.07.2023 रोजी स्थळ पाहणी केली असता पाणथळ व कांदळवन जागेचा ऱ्हास झालेला दिसून | 1. जिल्हाधिकारी रायगड<br>2. पनवेल महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | येत नाही. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात डेब्रीज टाकल्याचे निदर्शनास आलेले होते. सदर जागेवर डेब्रीज उचलण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून तात्काळ कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल. सदर ठिकाणी डेब्रीज टाकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणेकामी पनवेल महानगरपालिकेने फिरते सुरक्षा रक्षक पथक नेमण्यात आलेले आहे. तसेच बेकायदेशीरपणे डेब्रिज डंपिंग केल्याबद्दल खारघर पोलिस ठाणे येथे संबंधित व्यक्ति विरुद्ध गुन्हा दाखल करण्याबाबत कळविले आहे.<br>• या प्रकरणी पनवेल महानगरपालिका यांना सदर तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 76 | तक्रार क्र.224<br><br>**1) श्री.वैभव म्हात्रे**<br>Destruction of Mangroves in Nhavekhadi, Near Ulwe Node, Navi Mumbai.<br>दि. 01.04.2023<br><br>**2) श्री. स्टॅलिन डी.**<br>i) NhavaKhadi Mangrove Destruction and illegal blocking of tide water.<br>ii) Rambagh Mangrove destruction, change of vegetation, illegal constructions and reclamation of coastal wetlands Taluka Panvel.<br>दि. 03.10.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.14.07.2023 रोजीच्या अहवालानुसार मौजे न्हावे खाडी उत्तरपाडा येथील स.नं.14/2 हा सिडको मालकीचा असून सदर जमीन मिळकत सिडकोसाठी संपादित झाली आहे. प्रत्यक्ष स्थळपाहणीवेळी कांदळवन वृक्षाची तोड केल्याचे दिसून येत नाही. मौजे न्हावे खाडी येथील मोरी/उघड यांचे काम सिडको मार्फत करण्यात आले नाही. सदर मोरी/उघड समुद्राचे भरती पाण्यापासून गावाच्या संरक्षण होण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. सदर मोरीमुळे कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदर जागेवर भराव नसून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता आहे. संयुक्त स्थळपाहणीवेळी किटकनाशकाचा वापर करुन खारफुटी नष्ट झाल्याची बाब दिसून आली नाही. स.नं.9/अ/740 हा सिडको मालकीचा असून संयुक्त स्थळपाहणीवेळी खारफुटी व खाडीमध्ये सिमेंट मिक्सर पाणी टाकल्याची बाब दिसून आले नसून कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• सिडको यांच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार जमिन भराव व खारफुटी वृक्षाची तोड व कत्तल थांबविण्यासाठी सिडकोतर्फे सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासंदर्भात सुरक्षा अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील पाण्याचे प्रवाह खंडित न करण्यासाठी सिडकोचे अधिकारी दर महिन्याला न्हावा खाडी येथील फ्लॅप गेट येथे भेट देवून पाहणी करतील व पाणी नियंत्रित आहे किंवा कसे याचे निरीक्षण करतील. सिमेंट कॉंक्रिट मिक्सरमधील शिल्लक कॉंक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकल्याचे आढळले नाही. परंतु अज्ञात व्यक्तीव्दारे रिकामे कॉंक्रिट मिक्सर तिथेच धुतल्याचे आढळले. भविष्यात अशी घटना पुन्हा पडू नये यासाठी सिडको सुरक्षा रक्षकांना सूचना करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व पनवेल महानगरपालिका यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सदरबाबत जिल्हाधिकारी, रायगड व सिडको यांनी सदर तक्रारीवर कार्यवाही करुन सविस्तर अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या. | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **त्यानुसार, जिल्हाधिकारी, रायगड व सिडको यांनी समितीस सादर केलेल्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | |
| 77 | तक्रार क्र.225 अज्ञात व्यक्ती न्हावे व नवखार ता.रोहा जि.रायगड जवळील कुंडलिका खाडीत मॅग्रोजची कत्तल करुन सेक्शन पंपाद्वारे अनधिकृतपणे वाळू उपसा होत असलेबाबत. दि. 20.02.2023. | • या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, रायगड |
| 78 | तक्रार क्र. 237 श्री. नरेशचंद्र सिंग Illegal reclamation of Wetlands and Mangroves (CRZ area) in Kharghar, Navi Mumbai.<br>दि. 15.05.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार मौजे खारघर ता.पनवेल येथील सेक्टर 25 येथील पेठ गावाच्या समोरील बाजुस वास्तु विहार रस्त्यालगत गुराचे गोठे व कार वॉशिंग सेंटर असे बेकायदेशीर व्यवसाय चालु असलेबाबत तसेच सदर ठिकाणी मच्छिमार व्यवसाय सुरु असलेबाबत मंडळ अधिकारी, कळंबोली यांनी नमूद केले असून, सदर ठिकाणी C.R.Z. क्षेत्रात कांदळवन जागेचा ऱ्हास झालेला दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना आवश्यक तपासणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व सिडको यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| 79 | तक्रार क्र. 240 श्री. सुनील अग्रवाल Massive destruction of Mangroves, Illegal CRZ encroachment & debris Dumping at Ulwe node Sector 2, 5, 6, 20, 21, 22, 23.<br>दिनांक 25.05.2023. | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सेक्टर 22 वगळता सेक्टर 2,5,6,20,21,23 येथे प्लॉटींग झाले असून पुर्णत: लोकवस्ती आहे. वरील सेक्टर मध्ये कोठेही कांदळवन क्षेत्र नाही. सेक्टर 22 मध्ये लोकवस्ती नाही. तसेच सदरची जागा ही मोकळी आहे. वर नमूद 2,5,6,20,21,22,23 ची स्थळपाहणी केली असता कांदळवन वनस्पतीची तोड झाल्याचे निर्देशनास आले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• सिडको यांच्या दि.10.08.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर विभागाकडून आजपर्यंत दोन घटनांबाबत दोन एफ.आय.आर. अनुक्रमे एफ.आय.आर. क्र. 0094 दि. 31 मार्च 2023 व एफ.आय.आर. क्र. 0165 दि. 21 मे 2023 एन.आर.आय. सागरी पोलिस ठाण्यात नोंदविले असल्याचे नमूद केले असून सदर एफ.आय.आर. च्या प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती तक्रारदार श्री. सुनिल अगरवाल यांना दि.23.06.2023 रोजी मेलद्वारे कळविण्यात आली आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी सिडको सोबत बैठक घेऊन झालेल्या कार्यवाहीचा अहवाल | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व सिडको यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी सिडको यांना सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 80 | तक्रार क्र. 242 श्री. बी. एन. कुमार CRZ Violation at Ulwe for Tirupati Balaji Temple at Plot No. 3 Sector 12, Ulwe node, Tal. Panvel and Dist. Raigad by M/s Tirumala Tirupati Devasthanam.<br>दिनांक 31.05.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे अहवालानूसार प्लॉट नं. 3 सेक्टर 12 उलवे नोड ता.पनवेल या जमीनीवर सद्यस्थितीत एल.अॅन्ड टी कंपनीचे मशीन, रेडिमीक्स, प्लॅन्ट, गाडया हायवा, पोकलन पार्किग, तिरुपती मंदिर जागेवर आहे. जागेच्या पश्चिमेला न्हावा शिवडी रस्ता आहे. जागेवर आज स्थितीला कांदळवन तोड झालेली नसल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांना सिडको सोबत बैठक घेऊन झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सिडको यांच्या दि.24.08.2023 रोजीच्या स्थळ पाहणी अहवालानुसार, सिडकोद्वारे तिरुमाला तिरुपती देवस्थानम यांना भूखंड क्र.3 सेक्टर -12, उलवे नोडमध्ये वितरीत केलेला असून सदर भूखंड पुर्वी एम.एम.आर.डी.ए. ला एम.टी.एच.एल प्रकल्पाकरीता तात्पुरत्या स्वरुपात भाडेपट्टा करारावर वितरीत करण्यात आला होता. सदर जागेवर कुठलेही मंदीराचे काम सुरु नसून, एम.टी.एच.एल प्रकल्पाचे सदर वितरीत केलेल्या भुखंडाच्या बाजुला कास्टिंग यार्ड कार्यरत आहे. तिरुपती देवस्थानम यांना वितरीत केलेल्या भूखंडास सि.आर.झेड. नियमावली लागू आहे. त्याअनुषंगाने तिरुपती देवस्थानम यांनी महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडून दि.26.05.2023 रोजी सि.आर.झेड मंजुरी प्राप्त केलेली आहे. तसेच सिडकोद्वारे सि.आर.झेड. नियमावलीनुसार बांधकाम परवानगीसुध्दा देण्यात आलेली आहे. परंतु अद्याप जागेवर भूमीपुजन व्यतिरिक्त मंदिराचे बांधकाम प्रत्यक्षात सुरु झालेले नाही.<br>• जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयातर्फे प्राप्त झालेल्या यादीनूसार पनवेल तालुक्यातील एकूण 35 ठिकाणांचे संभावित पाणथळ जागेवर पडताळणी करण्यात आली आहे. सदर यादीनूसार मौजे-गव्हाण, ता. पनवेल येथे (तिरुमाला तिरुपती देवस्थानम यांना वितरीत केलेल्या भूखंडाजवळ) कुठल्याही प्रकारचे पाणथळ दर्शविण्यात आलेले नाही. तसेच सदर नमूद केलेल्या भूखंडावरील जमीन सिडकोद्वारे संपादित केलेल्या असून जागेवर पावसामुळे पाणी साचल्याचे दिसून येते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व सिडको यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **याबाबत, जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | 1. जिल्हाधिकारी.रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| 81 | तक्रार क्र.275 श्री. विकी पाटील. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, | 1. व्यवस्थापकीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | Mangrove Cutting on MTDC land at Nagoan Beach, Alibaug. दि. 03.11.2023. | मुंबई यांचेमार्फत दिनांक 09.11.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ<br>2. जिल्हाधिकारी, रायगड |
| 82 | तक्रार क्र.277 कळंबोली सिडको कार्यालय सेक्टर 5E जवळ कांदळवन मध्ये जोरदार पणे पत्रा, सिमेंटचे बांधकाम करुन नवनवीन उद्योग सुरु होत असल्याबाबत. दि.07.11.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 17.11.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापि, अहवाल अप्राप्त आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व सिडको यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व सिडको यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 1. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. जिल्हाधिकारी रायगड |
| 83 | तक्रार क्र.287 श्री. संकल्प श्री. Taloja River being filled with sand on greenzone area between Kharghar and Roadpali / Kalamboli, Navi Mumbai. दि.21.12.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 02.01.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापि, अहवाल अप्राप्त आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड व पनवेल, महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 1. पनवेल महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी रायगड |
| 84 | तक्रार क्र.288 श्री.बी.एन.कुमार CIDCO has been floating tenders for Plots that include CRZ –I and CRZ – II. दि.27.12.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 04.01.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापि, अहवाल अप्राप्त आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे, सिडको, MCZMA, जिल्हाधिकारी, रायगड यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 1. MCZMA<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3. जिल्हाधिकारी रायगड<br>4. व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| 85 | तक्रार क्र. 290 सौ. वर्षा किसन तांडेल मौजे चाणजे, ता.उरण, जि. रायगड येथील स.नं.419 क्षेत्र 12-85-00 हे. आर ह्या सरकारी खाजण जमीनीबाबत. दि.15.01.2024. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 17.01.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. तथापि, अहवाल अप्राप्त आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड व सिडको यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. जिल्हाधिकारी रायगड |

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 86 | तक्रार क्र. 134 श्रीमती श्वेता भट<br>दि.11.05.2020<br>Destruction of Mangroves at Sasunavghar, Vasai, Palghar. | • या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सदर प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, पालघर |
| 87 | तक्रार क्र. 189 श्री. भरत पाटील,<br>दि.19.05.2022<br>कांदळवनाची बेकायदेशीर कत्तल होत असल्याबाबत. | • सदर प्रकरणी वसई-विरार शहर, महानगरपालिका यांना स्थळपाहणी अहवाल छायाचित्रांसहित 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्यानुसार, वसई विरार शहर, महानगरपालिका यांच्या दि.27.12.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील गाव मौजे ससुनवघर स.न.100, 193 नायगाव (पूर्व) येथे पाहणी केली असता सदर जागेत नगररचना विभागाकडील परवानगी बाबतचे VVCMC/TP/CC/VP-6475/97/2022-23 Date.30.06.2022 फलक आढळून आले तसेच उर्वरित जागेवर बांधकाम झाल्याचे दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **याबाबत, वसई-विरार, महानगरपालिका यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | 1. जिल्हाधिकारी, पालघर<br>2. आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका |
| 88 | तक्रार क्र.208<br>श्री.निलेश वर्तक व श्री.अमर म्हात्रे यांच्या वसईतील रानगावात शासकीय जागेवर कांदळवनाची तोड होत असल्याच्यातक्रारीबाबत.<br>दि.18.01.2023 | • जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.26.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, कांदळवनाचा ऱ्हास झाला असून मे. राहुल कन्स्ट्रक्शन तर्फे श्री.धनंजय लक्ष्मण मोहिते रा.201 पुजा पॅराडाईस सेन्ट जोजेफ स्कुल फादरवाडी वसई यांचे विरुध्द वसई पो.स्टे. येथे गु.र.नं 0201/2023 दिनांक 06/07/2023 रोजी पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये गुन्हा दाखल केला असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर यांना सदर जागेवरील बांधकाम तोडून कांदळवनाची पुर्न:लागवड करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सदर प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी पालघर |
| 89 | तक्रार क्र.222 | • जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.26.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे. श्री.धनेश्रवर प्रभाकर भोईर, किशनलाल मांगीलाल त्रिवेदी व मंगेश नारायण चव्हाण यांचे विरुध्द | 1. जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.मॅकेन्झी डाबरे व श्री.जॉय जोसेफ फरगोज<br>घोडबंदर ते ससूनवघर दरम्यान पाणथळ जमिनीवरील प्रचंड मोठया प्रमाणात कांदळवनाची तोड करुन भराव घातला जात असल्याबाबत.<br>दि. 14.03.2023 | नायगांव पो.स्टे. येथे गु.र.नं 132/2023 व गु.र.नं 135/2023 दिनांक 05.06.2023 रोजी पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये गुन्हा दाखल करणेत आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून जागेवरील भराव त्वरित काढून पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सदर प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर व वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• सदर प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर व वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर व वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 2. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका |
| 90 | तक्रार क्र. 241<br>श्री. दिनेश गोसावी परिवर्तन संघटना पालघर<br>Complaint regarding Destruction of Mangroves.<br>दिनांक 29.05.2023. | • या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी जागेवरील भराव काढणेसंबंधी त्वरीत कार्यवाही करावी व पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• तथापि, अतिरिक्त आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या दि.07.12.2023 रोजीच्या उपविभागीय अधिकारी, वसई यांना उद्देशून लिहलेल्या पत्रान्वये सदर प्रकरणी प्र.सहा.आयुक्त, विशेष नियोजन प्राधिकरण – 21 गावे, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी केलेल्या प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवालानूसार वसई विरार शहर महानगरपालिकेकडे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार असलेल्या टिवरी गावामध्ये टिवरी फाटकापासून वसईच्या दिशेने जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर टिवरी ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोरच्या क्षेत्रामध्ये व टिवरी गावामध्ये टिवरी तलावाच्या समोरच्या क्षेत्रामध्ये माती भराव सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याची Geotag छायाचित्र सोबत जोडली असून, सदर जागेवर भराव करणाऱ्या संबंधितांवर आपल्या कार्यालयामार्फत नियमोचित कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी पालघर |
| 91 | तक्रार क्र. 243<br>श्री. चंदू विजय पाटील | • या प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर यांनी वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून आवश्यक कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते. | 1. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.12.06.2023.<br><br>मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत नायगाव जुचंद्र येथील वसई खाडीपात्राच्या जमीनीवरील ॲग्रोसर्ग इरिडेटर्स इंडिया प्रा. लि. कारखान्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करीत पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याप्रकरणी सदर कारखाना तात्काळ बंद करण्यात येणेबाबत. | • त्यानुसार, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे कार्यालयाचा दि.06.11.2023 रोजीच्या पत्रान्वये समितीस सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, मौजे-जुचंद्र सर्वे नं.86/1/3, 86/1/6, 96/2,96/3 ह्या जागेवर तत्कालीन नियोजन प्राधिकरण सिडको यांचे मार्फत बांधकाम परवानगी BP-3049 जा.क्र. CIDCO/VVSR/CC/BP-3049/E/2003 दिनांक 13/06/2005 अन्वये देण्यात आली आहे. तसेच जा.क्र. CIDCO/VVSR/POC/BP-3049/E/888 दि. 02/05/2008 अन्वये Part Occupancy Certificate (भाग भोगवटा दाखला) अदा करणेत आले असल्याचे नमूद केलेले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई सदर तक्रारीबाबत कार्यवाही करुन सविस्तर अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई सदर तक्रारीबाबत कार्यवाही करुन सविस्तर अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 2. जिल्हाधिकारी, पालघर |
| 92 | तक्रार क्र.248 श्री. कैलास चव्हाण सर्व्हे क्र.248, ज्युचंद्र मौजे या मिळकतीवर यालगत 24 एकर मिळकतीवर कैलास द्वारकानाथ म्हात्रे (भुमाफिया) व यांचे 20 ते 25 सहकारी भुमाफिया व गुंड यांनी हजारो कांदळवनाच्या झाडाची कत्तल करुन 80 ते 90 हजार ब्रासचे गौणखनिज (माती, दगड, मुरुम) बाहेरुन वाहतूक आणून मोठ-मोठे तलाव भराव करुन या मिळकतीवर केलेल्या भरणीची शासनाची कोणतीही पुर्व परवानगी घेतली नाही आणि 2000 पक्के बांधकाम करुन चाळी बनवित आहेत, हे पक्के बांधकाम तात्काळ निष्कासन करावे व जमीन कब्जा केल्याचा दंड व गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत याबाबत तक्रार अर्ज. दि.28.05.2023 | • जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.26.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे. श्री. कैलास द्वारकानाथ म्हात्रे व इतर 20 ते 25 सहकारी यांचे विरुध्द नायगांव पो.स्टे. येथे गु.र.नं 182/2023 दिनांक 04.07.2023 रोजी पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये गुन्हा दाखल करणेत आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना तक्रारीत नमूद अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्यानुसार, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे कार्यालयाचा दि.06.11.2023 रोजीच्या पत्रान्वये समितीस सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "जी" वालीव कार्यक्षेत्रातील गाव मौजे जुचंद्र स.नं. 248 येथे सदर परिसरात कांदळवनाच्या झाडांची कत्तल करुन अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून तहसिलदार यांनी सदर जागामालकावर गुन्हा नोंद केलेला आहे. तसेच, सदर ठिकाणी रहिवास वापर नसलेल्या रुम/गाळे यांचेवर निष्कासनाची कारवाई केलेली असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी **वसई-विरार महानगरपालिका** उर्वरित अनधिकृत बांधकामे काढून केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी वसई-विरार महानगरपालिका उर्वरित अनधिकृत बांधकामांना काढून केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च: सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 93 | तक्रार क्र. 249 श्री. मॅकेन्झी डाबरे<br><br>जिल्हा पालघर, तालुका वसई येथील पाणथळ, खाजण, कांदळवन जमीन बाधित होत असल्याबाबत.<br><br>दि.28.06.2023. | • वसई विरार शहर महानगरपालिका यांचे कार्यालयाचा दि.06.11.2023 रोजीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, तक्रारीत नमूद मालजीपाडा गाव वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरण विभागाच्या 21 गावांच्या हद्दीमध्ये समाविष्ट आहे. सदर गावामध्ये दि. 22.06.2023 रोजी स्थळपाहणी करण्यात आलेली असून तेथे कांदळवनावर मातीभराव झाल्याचे दिसून आलेले नाही. परंतू, मालजीपाडा गावामध्ये राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेल्या आर.एम.सी प्लांटच्या मागच्या बाजूच्या क्षेत्रामध्ये व त्यालाच लागून असलेल्या उत्तर बाजूच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात माती भराव सुरु असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत तहसिलदार, वसई यांना पत्राद्वारे कळविण्यात आल्याचे नमूद केलेले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी उप विभागीय अधिकारी, वसई यांचे कडून सदर तक्रारीवर कार्यवाही करुन घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी उप विभागीय अधिकारी, वसई यांचे कडून सदर तक्रारीवर कार्यवाही करुन घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका |
| 94 | तक्रार क्र.262 श्री. तुषार प्रकाश मोरे वनविभागाच्या जागेत अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या कब्जा केल्याबाबत. दि.22.08.2023. | • **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी पालघर |
| 95 | तक्रार क्र.265 श्री. कृष्णा गुप्ता वैतरणा येथे रेल्वे ब्रीज क्र.92 च्या पश्चिम दक्षिण दिशेला अंदाजे 300 मी अंतरावर आजूबाजूच्या ठिकाणी कांदळवन नष्ट केल्याप्रकरणी. दि.25.08.2023. | • **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, पालघर |
| 96 | तक्रार क्र.266 श्री. कृष्णा गुप्ता वसई तालुक्यातील खानिवडे, हेदवडे गाव येथील मोठया प्रमाणातकांदळवन (Mangroves) नष्ट केल्याप्रकरणी "पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986' अन्वये तातडीने फौजदारी कारवाई करुन, गुन्हा दाखल करणेबाबत. | • **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.25.08.2023. | | |
| 97 | तक्रार क्र.270 श्री. निलेश फापाळे पालघर जिल्ह्यातील वसई तालुका हद्दीतील CRZ बाधित मौजे ससूनवघर सर्वे क्र.175 मध्ये कांदळवनाची झाडे नष्ट करत असल्याबाबत.<br>दि.05.09.2023. | • **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर व वसई –विरार शहर महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका |
| 98 | तक्रार क्र.272 श्री. स्टॅलिन डी.<br>Floods caused by destruction of wetlands, Mangroves low lying areas along Gujrat Highway after Vasai Creek bridge. | • **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर व वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी पालघर<br>3. उप वनसंरक्षक, डहाणू |
| 99 | तक्रार क्र.283 श्री. मॅकेन्झी डाबरे खाजण जमिनीवरील पाच एकर क्षेत्रातील मॅग्रोज कत्तल करुन केलेल्या बेकायदा बांधकामावर तसेच मॅग्रोजची कत्तल करणाऱ्या कैलास म्हात्रे व इतर इसमांविरोधात कारवाई होणेकरीता धरणे आंदोलनाबाबत.<br>दि.29.11.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 05.12.2023 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर व उप वनसंरक्षक, डहाणू यांना सदर तक्रारीवर कार्यवाही करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी पालघर<br>2. उप वनसंरक्षक, डहाणू |

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **रत्नागिरी जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 100 | तक्रार क्र. 289 श्री. बापू सावळाराम जगधने.<br>अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणावर कांदळवनाची कत्तल करुन व खाडी पात्रात भराव करुन पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या वाळू माफीयांच्यावर कडक कार्यवाही होणेसंदर्भात.<br>दि.15.01.2024. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 17.01.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता.<br>• त्याबाबत, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालयाचा दि. 29 जानेवारी, 2024 रोजीच्या अहवालात, दि. 18 जानेवारी, 2024 रोजी तक्रारदार यांचे समवेत स्थळपहाणी केली असता, मौजे म्हाप्रळ, ता. मंडणगड येथील स.नं. 83/4 मध्ये कांदळवन वनस्पती सुस्थितीत असून कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही. स.नं.85/3 ची पहाणी केली असता त्यामध्ये सिमाब मुकादम यांचे मालकीची इमारत असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची कांदळवन वनस्पती नाही. स.नं.85/2 ची पहाणी केली असता त्यामध्ये कांदळवन वनस्पती असून काही भाग पाणथळ आहे. त्यामध्येही वृक्षतोड अथवा भराव केल्याचे दिसून येत नाही. स.नं.86/1 व 88/19 याची पहाणी करता त्यामध्ये जंगली झाडे व झुडपे असून कांदळवन वनस्पती दिसून येत नाही. त्यानंतर खाडी पात्रापासून साधारण 3 कि.मी. अंतरावर स.नं.36/16 व 36/27 याची पाहणी करता क्षेत्रामध्ये जंगली वनस्पती व झुडपे असल्याची खात्री होत आहे. वरीलप्रमाणे तक्रारी अर्जाच्या नमूद स.नं. यांची खात्री करता त्यामध्ये कोणतीही कांदळवन वनस्पती तोडल्याचे अथवा भराव केल्याचे दिसून आलेले नाही असे नमूद केले आहे.<br>• **त्यानूसार, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अहवालाच्या अधीन राहून मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | 1. जिल्हाधिकारी, रत्नागिरी<br>2. विभागीय वन अधिकारी, चिपळूण, जि. रत्नागिरी. |

(एस.व्ही.रामाराव)
**सह अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,**
**तथा अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष**

(डॉ.महेंद्र कल्याणकर)
**अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**

## 28th State Mangrove Monitoring Committee Meeting
## Review Chart of Total Complaints Received

| District | Total No of Complaints in 28th Meeting | Total No of Resolved Complaints in 28th Meeting | Total No of Reports Received Till 28th Meeting | Pending Complaints from 28th Meeting | Total No of Restoration Complaints in 28th Meeting |
|---|---|---|---|---|---|
| | | | | A | D |
| Mumbai City | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Mumbai Suburban | 27 | 0 | 20 | 27 | 8 |
| Thane | 41 | 18 | 35 | 23 | 3 |
| Palghar | 14 | 1 | 7 | 13 | 3 |
| Raigad | 17 | 4 | 11 | 13 | 3 |
| Ratnagiri | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| Sindhudurg | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| **Total** | **100** | **24** | **73** | **76** | **19** |